वर्ष: 7 अंक: 08

16-31 ऑक्टोबर, 2026 (विनामूल्य)

न्यू इंडिया समाचार

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia



राष्ट्रीय एकता दिन विशेष

एकसंध भारताची शक्ती श्रेष्ठ भारताचा संकल्प

सरदार पटेल यांच्या 150 व्या जयंतीच्या सांगता वर्षात- 'एक भारत श्रेष्ठ भारत' ही भावना सांस्कृतिक बंधांच्या पलीकडे जाऊन धोरणनिर्मितीचा आत्मा बनली आहे, ज्यामुळे गेल्या 11 वर्षांत यंत्रणांच्या एकात्मिकरणातून प्रत्येक नागरिकाचे जीवन सुलभ, सोपे आणि सक्षम झाले असून, त्यांच्या भारतीयतेची भावना रुजली आहे.



दहशतवादाविरोधात भारताचे शून्य सहनशीलतेचे धोरण



मन की बात या कार्यक्रमात केवळ देशवासीयांच्या सकारात्मक प्रयत्नांनाच व्यासपीठ मिळत नाही, तर देशाच्या यशाबद्दलची चर्चाही केली जाते. या व्यासपीठावरून जेव्हा या विषयांवर चर्चा होते, तेव्हा देशाच्या इतर भागांतील लोकही त्यापासून प्रेरित होतात. 27 सप्टेंबर रोजी प्रसारित झालेल्या मन की बात या कार्यक्रमाच्या 138 व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्जिकल स्ट्राइक, डिजिटल जनगणना, भारतीय संस्कृती, प्राचीन मंदिरे, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, नशामुक्ती अभियान, क्रीडा, एक जिल्हा एक उत्पादन (ओडीओपी) आणि पोषण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. सादर आहे मन की बातचा संपादित अंश...

- **सर्जिकल स्ट्राइक :** दहा वर्षांपूर्वी 28 - 29 सप्टेंबर 2016 रोजी भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर सर्जिकल स्ट्राइक केला होता. नियंत्रण रेषा पार करून आपल्या वीर जवानांनी दहशतवादाविरोधात ज्या प्रकारे कारवाई केली होती, ते पाहून जग थक्क झाले होते.
- **कठोर उत्तर:** गेल्या एका दशकभरात बालाकोट एअर स्ट्राइकपासून ते ऑपरेशन सिंदूरपर्यंत भारताने वारंवार हा स्पष्ट संदेश दिला आहे की, जर दहशतवाद्यांनी भारताकडे वाईट नजरेने पाहिले तर त्यांना कठोर उत्तर दिले जाईल.
- **शून्य सहनशीलतेचे धोरण:** आजचा भारत दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण अंगिकारून पुढे वाटचाल करतो आहे. याचे परिणामही आपल्याला दिसून येत आहेत.
- **रामजन्मभूमी आंदोलन:** विश्व हिंदू परिषदेचे माजी आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष माननीय दिवंगत अशोक सिंगल यांनी रामजन्मभूमी आंदोलनाला जी दिशा दिली, त्याचाच परिणाम म्हणून आज आपण अयोध्येत भव्य मंदिर साक्षात पाहत आहोत.
- **पहिले सौर ग्राम:** मोढेरा आज केवळ सूर्य मंदिरासाठीच ओळखले जात नाही, तर गुजरातचे हे गाव देशातील पहिले सौर ग्राम बनले आहे. मोढेरा आज सौर ऊर्जेवर चालते आणि या गावाने देशासमोर शाश्वततेचे एक उदाहरण मांडले आहे.
- **पौष्टिक शेवगा:** छत्तीसगडने हर घर मुनगा - घर-घर मुनगा (प्रत्येक घरी शेवगा - घरोघरी शेवगा) ही मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत लोकांना पौष्टिक शेवग्याचा म्हणजेच मोरिंग्याचा आपल्या आहारात समावेष करावा यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे.
- **नवी शक्यता:** उत्तर प्रदेशातील प्रतापगडमध्ये आवळा आज नव्या शक्यतांचे माध्यम बनू लागले आहे. एक जिल्हा, एक उत्पादनाच्या माध्यमातून इथे आवळ्याशी संबंधित स्थानिक उद्योगांना चालना मिळाली आहे. आज प्रतापगडमध्ये आवळा प्रक्रियेशी संबंधित सुमारे 100 उद्योग कार्यरत आहेत.
- **अष्टविनायक यात्रा:** पंथौन थीरखानोन यांच्या प्रयत्नांमुळे थायलंडच्या भाविकांमध्ये अष्टविनायक यात्रा लोकप्रिय झाली आहे. 2002 मध्ये त्यांनी उत्तर थायलंडमधील चियांग माई इथे गणेश हिमाल संग्रहालयाची स्थापना केली होती. आज या संग्रहालयात 10 हजारांपेक्षा जास्त गणेशमूर्ती आहेत.
- **नशामुक्ती अभियान:** नशामुक्त युवा अभियानाअंतर्गत देशातील लाखो युवांनी व्यसनांविरोधात एक महत्त्वाचा संकल्प केला आहे. युवा वर्गाने स्वतःही व्यसनापासून दूर राहण्याचा प्रण केला आहे आणि हा संदेश इतरांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारीही घेतली आहे.
- **प्रेरक उदाहरण:** निसर्गासोबतचे आपले नाते केवळ निसर्गाचे जतन करण्यापुरते मर्यादित नाही. अनेकदा आपण निसर्गाचे संवर्धन करतो, त्यावेळी तोच निसर्ग आपल्या जगण्याचा आधार बनतो. पश्चिम बंगालमधील सुंदरबनमधील काही महिलांनी याच नात्याचे प्रेरक उदाहरण मांडले आहेत.
- **हत्तींचे कळप:** आसाममध्ये सोनाई रुपाई वन्यजीव अभयारण्य आहे. इथे हत्ती पुन्हा परतले आहेत. ज्या भागात वर्षांनुवर्षे हत्तींचे वास्तव्य नव्हते, आज तिथेच पुन्हा हत्तींचे कळप दिसू लागले आहेत.

मन की बात पूर्ण ऐकण्यासाठी क्यूआर (QR) कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार

वर्षः 7, अंकः 08 । 16-31 ऑक्टोबर, 2026

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा
मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
सत्यम सिंह
अनिल कुमार



13 भाषांमध्ये उपलब्ध असलेले न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा.

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारसंबंधीच्या सातत्यपूर्ण अपडेट्ससाठी फॉलो करा : @NISPIBIndia

आतील पानांवर...



एक भारत - श्रेष्ठ भारत

सांस्कृतिक मिलाफापासून ते यंत्रणांच्या एकात्मिकरणापर्यंत

एकता ही देश आणि समाजाच्या अस्तित्वाचा आधार असते.31 ऑक्टोबर 2015 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवडियाच्या पवित्र भूमीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक भारत श्रेष्ठ भारत या मोहिमेची सुरुवात केली होती. सरदार पटेल यांनी ज्या प्रकारे सुमारे साडेपाचशे संस्थानांना एका झेंड्याखाली जोडले होते, त्याच विचाराने 11 वर्षांपूर्वी सुरू झालेली एक भारत श्रेष्ठ भारत ही मोहीम आता करव्यवस्था, शिधा, निवृत्तीवेतन, राज्यघटना, परीक्षा आणि संशोधन यांसारख्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून एक देश - एक यंत्रणा या संकल्पनेचा आधारस्तंभ बनली आहे... | 10-27

सेमीकॉन इंडिया 2026

सेमीकंडक्टरची परिसंस्था

निर्माण करू लागली आहे नवोन्मेष, गुंतवणूक आणि विकासाच्या नव्या संधी

पंतप्रधान मोदी यांनी देश विदेशातील गुणवंत युवांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासात भागीदार होण्याचे केले आवाहन | 32-33



विशेष : पंतप्रधानांचा लेख

"श्री अशोक सिंगल यांचे व्यक्तिमत्त्व दृढ संकल्प आणि साधेपणाचा अद्भुत संगम होते"



पंतप्रधान मोदी यांनी अशोक सिंगल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाला आणि विचारांना समर्पित श्रद्धांजली स्वरूपातील लेख केला सामायिक | 7-9

वृत्तसारांश | 4-5

व्यक्तिमत्त्व : कोमाराम भीम
ज्यांनी दिली जल, जंगल, जमिनीची घोषणा | 6

रब्बी पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ, हरित ऊर्जा कॉरिडॉर टप्पा-III ला मंजुरी
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले महत्त्वाचे निर्णय | 28-29

भविष्यकाळासाठी युवा वर्गाला सज्ज करत आहे केंद्र सरकार
51,000 पेक्षा जास्त नियुक्तीपत्रे रोजगार मेळ्यात वितरित | 30-31

संपर्क जोडणीही ... आत्मनिर्भर भारताला बळकटीही
उडान योजनेची 10 वर्षे : भारताच्या आकांक्षांचा सोहळा | 34-35

बंगालमधील महिलांचे नवे सामर्थ्य
अन्नपूर्णा योजनेचा 3,000 रुपयांचा चौथा हप्ता जारी | 36-37

विकासासोबतच पर्यावरण संरक्षण
हवामान बदलावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत पंतप्रधान मोदी यांचे संबोधन | 38-39

राजधानीतील संपर्क जोडणीला नवी गती
गृहमंत्री अमित शाह यांनी केले बारापुला टप्पा-3 एलिव्हेटेड कॉरिडॉरचे उद्घाटन | 42

72 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार

भारतीय चित्रपटांमध्ये भविष्यातील शक्यता



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे केले वितरण | 40-41



प्रकाशक : कंचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्यूरो), पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : **खोली क्र. - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003, ईमेल - response-nis@pib.gov.in आर.एन.आय. क्रमांक DELHIN/2020/78812**

संपादकांच्या लेखणीतून...

सरदार पटेल यांचा विचार, एकतेचा आधार
एक भारत श्रेष्ठ भारत मोहिमेची 11 वर्षे

सप्रेम नमस्कार,

एकसंध देश केवळ नकाशाद्वारे किंवा भौगोलिक सीमांद्वारेच बनत नाही, तर त्याची जडणघडण समग्रतेच्या भावनेतून होत असते. भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर लगेचच 550 पेक्षा जास्त विखुरलेल्या संस्थानांना एका राष्ट्राच्या धाग्यात गुंफून हाच विश्वास प्रस्थापित केला होता. इतिहास लिहिण्यात वेळ घालवू नये, तर इतिहास घडवण्यासाठी मेहनत केली पाहिजे, असे सरदार पटेल मानत असत. हीच भावना त्यांच्या निर्णयांमध्येही दिसून येत होती.

व्यवहारात वास्तववादी, संकल्पात सत्यवादी, कार्यात मानवतावादी आणि ध्येयाच्या बाबतीत राष्ट्रवादी असलेल्या सरदार पटेल यांच्यासाठी एक भारत श्रेष्ठ भारत हा विचार सर्वोच्च स्थानी होता. याच भावनेचे प्रतीक म्हणजे स्टॅच्यू ऑफ युनिटी. या पुतळ्याच्या उभारणीसाठी देशभरातील शेतकऱ्यांच्या शेतात वापरल्या गेलेल्या अवजारांचे लोखंड गोळा केले गेले.

तोच वारसा पुढे नेत 31 ऑक्टोबर 2015 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवडिया इथून एक भारत श्रेष्ठ भारतचा संकल्प मांडला. गेल्या 11 वर्षांत हा संकल्प एकापाठोपाठ एक धोरणांतून साकार होत गेला आहे. एकसमान करव्यवस्थेने राज्यांच्या बाजारपेठा जोडल्या, एक पद एक निवृत्तीवेतनाच्या (वन रँक वन पेन्शन) माध्यमातून सैनिकांमधील दशकांपासूनची असमानता दूर केली, कलम 370 निष्प्रभ करून जम्मू कश्मीरसह संपूर्ण देशाला एकसमान घटनात्मक अधिकार दिले गेले आणि संपूर्ण देशात भारतीय मानक वेळेला (IST) एकसमान वेळ संदर्भ पुरवण्यासाठी करण्यासाठी नियम बनवले गेले. नव्या शैक्षणिक धोरणाअंतर्गत भारतीय भाषांवर दिलेला भर तसेच तामिळ, तेलगू, संस्कृत, मल्याळम, ओडिया आणि कन्नड यांच्यासह मराठी, बांगला, आसामी, पाली आणि प्राकृत भाषांना अभिजात भाषांचा दर्जा देण्यातूनही याच एकात्मतेला बळकटी मिळते. वेगाने बनणारे रेल्वे मार्ग, महामार्ग आणि इंटरनेट जाळ्याच्या माध्यमातूनही गावांना शहरांशी जोडत याच एकात्मतेला बळ दिले आहे.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही 31 ऑक्टोबर रोजी सरदार पटेल यांची जयंती साजरी केली जाणार आहे. त्यावेळी हा प्रसंग केवळ त्यांच्या स्मरणाचा नाही, तर संकल्पाच्या नूतनीकरणाचाही असणार आहे. यानिमित्तानेच 11 वर्षांपूर्वी निर्माण झालेली एक भारत श्रेष्ठ भारताची भावना कशा रितीने धोरणनिर्मिती आणि व्यवस्थांच्या एकत्रीकरणाचा संकल्प बनली, हाच विषय या वेळच्या राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आपल्या मुखपृष्ठ कथेचा विषय बनली आहे.

याव्यतिरिक्त व्यक्तिमत्त्व या मालिकेअंतर्गत जल, जंगल, जमिनीची घोषणा सर्वप्रथम देणारे कोमाराम भीम, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, उडान या महत्त्वाकांक्षी योजनेची 10 वर्षे यावरील विशेष मांडणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंधरवडाभरातील कार्यक्रमांचा या अंकात समावेश करण्यात आला आहे.

यासोबतच, नियतकालिकाच्या आतील पानावर मन की बात आणि मलपृष्ठावर 21 ऑक्टोबर रोजी आझाद हिंद सरकार स्थापना दिनानिमित्त विशेष लिखाणही या अंकात आहे.

आपण आपल्या सूचना आम्हाला पाठवत राहावे.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले नियतकालिक वाचा / डाउनलोड करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

आपली मते...





स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी न्यू इंडिया समाचार नियतकालिक अत्यंत उपयुक्त

मी न्यू इंडिया समाचारचा नियमित वाचक आहे आणि हे नियतकालिक केंद्र सरकारच्या योजना, धोरणे आणि चालू घडामोडींबद्दल स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त वाटते. या नियतकालिकामुळे देशाच्या प्रगतीबद्दल माझ्या ज्ञानात भर पडते. मला एक जबाबदार नागरिक म्हणून अधिक समजून घेण्यास आणि सहभागी होण्यास प्रेरणा मिळते.

निवेश गोयल

goyalnivesh98@gmail.com

नव्या अंकाची उत्सुकतेने वाट पाहत असतो

मला न्यू इंडिया समाचार नियतकालिक वाचायला खूप आवडते. मी या नियतकालिकाच्या नव्या अंकाची उत्सुकतेने वाट पाहत असतो. प्रत्येक वेळी हे नियतकालिक वाचताना मला देशाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेबद्दल अधिक जाणून घ्यायला मिळते. तसेच, या नियतकालिकात देशाच्या विकासाच्या शक्यताही मांडलेल्या असतात. विकसित भारत 2047 चे ध्येय गाठण्यासाठी देश प्रत्येक क्षेत्रात कसा वेगाने पुढे जात आहे, याबद्दलही माहिती मिळते.

shivanshchouhan397@gmail.com

आपल्या ध्येयांच्या प्रवासाचा एक आदर्श दस्तऐवज

न्यू इंडिया समाचार नियतकालिक पहिल्यांदाच जवळजवळ पूर्ण वाचले. आता पुढील ई मेल कधी येईल, याची प्रतीक्षा असेल. या नियतकालिकातून खूप मौल्यवान माहिती मिळते. देशाच्या विकासाच्या कधीही न थांबणाऱ्या प्रवासाची गाथा आणि आपल्या ध्येयांच्या प्रवासाचा एक आदर्श दस्तऐवज. भारत हा नेहमीच ज्ञानाचे केंद्र राहिला आहे. माझी एक सूचना आहे की, विकासाची मुळे घट्ट करण्यासाठी बालविकासही आवश्यक आहे. त्यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून भविष्य अधिक सुरक्षित करता यावे यासाठी बालविकास परंपरेलाही आपल्या या नियतकालिकात स्थान मिळायला हवे.

nanda.purnimaa@gmail.com

नियतकालिकातून प्रकाशित होते तपशीलवार माहिती

न्यू इंडिया समाचार नियतकालिक सात वर्षांपासून प्रकाशित होत आहे. हे खूप मोठ्या प्रमाणात वाचले जाणारे पाक्षिक नियतकालिक आहे. या नियतकालिकात विविध योजना, मोठे प्रकल्प, नवे शैक्षणिक धोरण, कायद्यांमधील मोठे बदल, पर्यावरणाच्या रक्षणासाठी केलेले प्रयत्न आणि जागतिक पटलावरील मजबूत व्यापारी संबंध यांबद्दलची तपशीलवार माहिती प्रकाशित होत असते. या नियतकालिकामुळे माझ्या माहितीसंपन्नतेत अधिक भर पडली आहे.

योगेश्वर बुवा

buwayogesh82@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्र. - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003

ईमेल- response-nis@pib.gov.in

वृत्त सार

पीएम विश्वकर्मा योजना

'सन्मान, सामर्थ्य आणि समृद्धी'ची तीन वर्षे, 30 लाख कारागिरांची नोंदणी







देशातील कारागिरांचा सन्मान, सामर्थ्य आणि समृद्धी वाढवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेत प्रारंभापासून अवघ्या तीन वर्षांत 30 लाखांहून अधिक कारागीर सामील झाले आहेत. 17 सप्टेंबर 2023 रोजी सुरू झालेल्या या योजनेद्वारे अंदाजे 24.50 लाख लोकांना मूलभूत कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. तर, इंडिया पोस्टमार्फत 18.15 लाख आधुनिक टूलकिटचे वितरण करण्यात आले आहे.

कोलकाता येथे पीएम विश्वकर्मा योजनेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त, केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जितन राम मांझी यांनी सांगितले की, 6.18 लाख विश्वकर्मा लाभार्थ्यांना वार्षिक 5 टक्के सवलतीच्या व्याजदराने 1 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देण्यात आले असून कर्जाची एकूण रक्कम 5,297 कोटी रुपये आहे. ही योजना मे 2026 पासून पश्चिम बंगालमध्ये राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, याअंतर्गत 7 लाखांहून अधिक लोकांनी अर्ज केला आहे.

प्रोजेक्ट चीता नंतर आता 'प्रोजेक्ट ऱ्हायनो' चा प्रारंभ

जगातील सुमारे 80% एकशिंगी गेंडे आढळणारे आसाम हे देशातील एकमेव ठिकाण आहे. म्हणूनच, जागतिक गेंडा दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आसाममधील काझीरंगा येथे होणारी शिकार रोखण्याच्या प्रयत्नांची प्रशंसा केली आणि देशातील गेंडा संवर्धन अधिक मजबूत करण्यासाठी 'प्रोजेक्ट ऱ्हायनो' सुरू करण्याची घोषणा केली.

'प्रोजेक्ट *हायनो' अंतर्गत, गेंडे असलेल्या राज्यांना आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य पुरवले जाईल. याद्वारे गेंड्यांचे संरक्षण, अधिवास व्यवस्थापन, जनुकीय सुधारणा आणि त्यांच्या संख्येचे निरीक्षण करण्यासारखी कामे केली जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, बिहार आणि पश्चिम बंगालच्या काही भागांमध्ये गेंडे एक तर परतले आहेत किंवा त्यांची चांगली काळजी घेतली जात आहे. उत्तर प्रदेशातील दुधवा येथे गेंड्यांच्या पुनर्वसनाचे प्रयत्नही यशस्वी झाले आहेत. ते म्हणाले की, हे यश वन्यजीवांचे संरक्षण आणि त्यांची उत्तम काळजी घेण्यासाठी लोकांच्या अविरत समर्पणाचे प्रतीक आहे.



परदेशातील रोजगारासाठी भारतातील कौशल्य विकास

भारत सरकार केवळ देशांतर्गत रोजगाराच्या संधी वाढवत नाही, तर परदेशात उपलब्ध असलेल्या संधींशी जुळवून घेण्यासाठी तरुणांना कौशल्य विकासाशीही जोडत आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने (एमएसडीई) आतापर्यंत सुमारे 20 देशांसोबत मागणीनुसार कुशल नोकरीच्या भूमिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

नीती आयोगाच्या मे 2026 च्या कार्यपत्रानुसार, भारतातील स्थलांतरित लोकसंख्या 1.85 कोटी आहे. एमएसडीई ने ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, फ्रान्स, जर्मनी, जपान, कतार, सिंगापूर आणि संयुक्त अरब अमिराती या आठ देशांसोबत कौशल्य आणि प्रशिक्षण सहकार्यासाठी करार केले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने 22 स्थलांतर आणि कामगार गतिशीलता करारांवर स्वाक्षरी केली आहे, ज्यामध्ये कौशल्य विकासाशी संबंधित विशिष्ट तरतुदींचा समावेश आहे.

'माय भारत ' शी जोडले गेले 3 कोटी युवक; सहभागाची दृढ बांधिलकी

तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीत, सर्वात मोठ्या युवा सहभाग मंचांपैकी एक असलेल्या 'मेरा युवा भारत' (**https://mybharat.gov.in**) मध्ये 3 कोटींहून अधिक तरुण सामील झाले आहेत. हे यश नेतृत्व, अनुभवात्मक शिक्षण, स्वयंसेवा, नागरी सहभाग आणि नागरिक उभारणीच्या संधींमध्ये युवकांचा वाढता सहभाग दर्शवते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 31 ऑक्टोबर 2023 रोजी 'माय भारत' सुरू केले. 'माय भारत' च्या माध्यमातून 'विकसित भारत युवा नेता संवाद 2027' सारखे उपक्रम राबवते, जे युवकांना त्यांच्या कल्पना, सर्जनशीलता, नेतृत्व आणि नाविन्यपूर्णता प्रदर्शित करण्याची संधी देते. 'विकसित भारत प्रश्नमंजूषा' कार्यक्रमांतर्गत 17 ऑगस्ट 2026 रोजी याची सुरुवात करण्यात आली.



भारताच्या वीज पुरवठ्यामुळे नेपाळ प्रकाशमान

'शेजारी प्रथम' या भावनेतून, भारताने आता नेपाळला दिवसातून 18 तास (मध्यरात्री 12 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत) वीजपुरवठा सुरू केला आहे. या निर्णयामुळे भारत आणि नेपाळ यांच्यातील घनिष्ठ आणि दीर्घकालीन ऊर्जा सहकार्य अधिक दृढ होईल.

ऊर्जा मंत्रालयाने 13 सप्टेंबरपासून नेपाळ विद्युत प्राधिकरणाला वीज निर्यात सुरू केली असून, ती 31 डिसेंबर 2026 पर्यंत सुरू राहील. जानेवारी 2027 पासून वीजपुरवठ्याचे प्रमाण आणि कालावधी निश्चित करण्यासाठी डिसेंबर 2026 मध्ये एक आढावा बैठक आयोजित केली जाईल. नेपाळमधील पूर आपत्तीनंतर, तेथील विद्युत पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, ज्यामुळे वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. मुझफ्फरपूर-ढालकेबर 400 केव्ही डीसी लाईनद्वारे 600 मेगावॅटपर्यंत आणि टिकापूर-महेंद्रनगर 132 केव्ही एस/सी लाईनद्वारे 54 मेगावॅटपर्यंत वीजपुरवठा केला जाईल.




भारतात पहिल्यांदाच शेतकऱ्यांना मृदा कार्बनसाठी पैसे

पंजाब आणि हरियाणात, पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणाऱ्या नवीन शेती पद्धती अवलंबल्या गेल्या, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा झाला. मृदा आरोग्य सुधारण्याच्या या अनोख्या उपक्रमांतर्गत, 2,500 हून अधिक शेतकऱ्यांना 3,000 ते 15,000 रुपयांच्या हिशोबाने एकूण सुमारे 2.9 कोटी रुपये देण्यात आले. देशात पहिल्यांदाच सुरू झालेला हा कार्यक्रम आता 7 राज्यांमधील 1,00,000 हून अधिक शेतकऱ्यांपर्यंत आणि 20 लाख (2 मिलियन) एकरपेक्षा जास्त जमिनीपर्यंत विस्तारला आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात पंजाब कृषी विद्यापीठापासून (लुधियाना) झाली. शेतकऱ्यांना ही रक्कम 'ग्रो इंडिया'च्या 'आदी' कार्बन कार्यक्रमाद्वारे मिळत आहे, जो 2019 मध्ये सुरू झाला. 2019 ते 2022 या काळात शेतकऱ्यांनी माताची थेट पेरणी, कमी मशागत आणि पिकाच्या अवशेषांचे व्यवस्थापन यांसारख्या तंत्रांचा अवलंब केला. उपक्रमानुसार, या पद्धतींमुळे 45 अब्ज लिटर पाण्याची बचत झाली, 2 लाख टनांपेक्षा जास्त पिकांचे अवशेष जाळणे टळले आणि हवेतील हानिकारक **PM**2.5 कणांचे उत्सर्जन अंदाजे 1,000 टनांनी कमी झाले. ■



ज्यांनी दिला जल, जंगल आणि जमिनीचा नारा



शौर्य आणि त्यागाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे कोमाराम भीम हे एक शूर आदिवासी योद्धे होते, ज्यांनी सर्वप्रथम जल, जंगल आणि जमिनीचा नारा दिला. इतकेच नाही, तर त्यांनी एकट्याने हैदराबादच्या निजाम आणि ब्रिटिश राजवटीविरुद्ध संघर्षाचे निशाण उभारले. ते गनिमी काव्याने लढले. गोंड संस्कृतीत कोमाराम भीम यांची देवता म्हणून पूजा केली जाते. बंड आणि संघर्षाचे प्रतीक असलेल्या भीम यांनी लाखो लोकांच्या, विशेषतः आदिवासी समाजाच्या हृदयावर एक अमिट छाप सोडली...

जन्म: 22 ऑक्टोबर,1901, निधन : 8 ऑक्टोबर,1940


दडपशाही आणि शोषणाविरुद्धच्या चळवळींचे नेते, कोमाराम भीम यांना आजही लोक, विशेषतः आदिवासी, देव म्हणून पूजतात. सध्याच्या तेलंगणा राज्यातील कोमाराम भीम जिल्ह्यातील संकेपल्ली गावात 22 ऑक्टोबर 1901 रोजी कोमाराम भीम यांचा एका गोंड आदिवासी कुटुंबात जन्म झाला. त्यांनी निजाम आणि ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध तीव्र लढा दिला. एका जमीनदाराच्या दडपशाहीचा निषेध करताना भीम यांना आपले गाव सोडण्यास भाग पडले. ते आसामच्या चहाच्या मळ्यांमध्ये पोहोचले. तिथे त्यांनी मजुरांचे दुःख पाहिले आणि विविध चळवळींमधून प्रेरणा घेतली. ते वाचायला आणि लिहायला शिकले आणि त्यांना जाणवले की संघटित लढा हा अन्यायाविरुद्ध सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. माघारी परतल्यावर त्यांनी आपल्या समाजाला जागृत करण्याचा निर्धार केला.

1926 ते 1940 या काळात त्यांनी गनिमी युद्धाच्या माध्यमातून निजाम राजवटीविरुद्ध अविरत मोहीम चालवली. जंगलात गनिमी सैन्य उभारणी करणाऱ्या कोमाराम यांनी धनुष्यबाण, भाले आणि पारंपरिक शस्त्रांच्या साहाय्याने निजामाच्या अद्ययावत सैन्याला आव्हान दिले. भीमाने गावोगाव फिरून लोकांना अत्याचाराविरुद्ध संघटित केले. अनेक वेळा कर गोळा करण्यासाठी सैनिक गावांमध्ये आले, पण भीम आणि त्यांच्या साथीदारांनी त्यांना हुसकून लावले.

असे मानले जाते की अल्लुरी सीताराम राजू यांच्या विचारांचा त्यांच्यावर खूप पगडा होता. देशाचे रक्षण करताना, 8 ऑक्टोबर 1940 रोजी अश्विन पौर्णिमेला झालेल्या एका भीषण लढाईत निजामाच्या सैन्याने छल कपट करून त्यांची हत्या केली. 2016 मध्ये, आसिफाबाद जिल्ह्याचे नामकरण कोमाराम भीम आसिफाबाद जिल्हा असे करण्यात आले. येथे एक स्मारक आणि कोमाराम भीम संग्रहालय उभारण्यात आले आहे. दरवर्षी, अश्विन पौर्णिमेला, गोंड समाज त्यांची पुण्यतिथी पाळली करतो. या निमित्ताने जोडेघाट येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित केला जातो. हे तेच ठिकाण आहे जिथे 1940 मध्ये कोमाराम भीम यांचे निधन झाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 16 ऑक्टोबर, 2025 रोजी 'मन की बात'च्या 127 व्या भागात कोमाराम भीम यांचे स्मरण केले. ते म्हणाले, 'मी ज्या महान व्यक्तिमत्त्वाविषयी बोलत आहे, ते म्हणजे कोमाराम भीम. 22 ऑक्टोबर ही त्यांची जयंती आहे.' कोमाराम भीम अल्पायुषी होते. ते केवळ 40 वर्षे जगले, परंतु त्यांच्या हयातीत त्यांनी असंख्य लोकांच्या, विशेषतः आदिवासी समाजाच्या हृदयावर एक अमिट छाप सोडली. त्यांनी निजामाविरुद्ध लढणाऱ्यांमध्ये नवी उर्मी जागृत केली. ते त्यांच्या रणनीतिक कौशल्यासाठीही ओळखले जात होते. ते निजामाच्या राजवटीसमोर एक मोठे आव्हान बनले होते. मी तरुणांना आवाहन करतो की त्यांनी त्यांच्याबद्दल शक्य तितके जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. ते पुढे म्हणाले, 'कोमाराम भीम की ना विनम्र निवाली. आयन प्रजल हृदयाल्लो...एप्पटिकी निलिची-वूंटारू.' याचा शब्दशः अर्थ आहे - कोमाराम भीमजींना माझी विनम्र आदरांजली, ते लोकांच्या हृदयात सदैव वास करतील. ▪

“श्री अशोक सिंघलजींचे व्यक्तिमत्व म्हणजे दृढनिश्चय आणि साधेपणा यांचा एक अद्भुत संगम होता.”



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 27 सप्टेंबर रोजी अशोक सिंघल यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या दृढ श्रद्धेचे, साधेपणाचे आणि सामाजिक ऐक्यासाठीच्या अढळ समर्पणाचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली. या वर्षी 27 सप्टेंबर पासून अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात झाली आहे. या निमित्ताने, त्यांनी त्यांच्या अथक संघटनात्मक कार्याचे स्मरण करत, त्यांच्या जीवन आणि विचारांना समर्पित एक लेख सामायिक केला.

एक अतिशय सुंदर सुभाषित आहे, “वृक्ष कबहुं नहिं फल भखै, नदी न संचै नीरः परमारथ के कारने, साधुन धरा शरीर।” याचा अर्थ झाड आपले फळ स्वतः कधी खात नाही, आणि नदी आपले पाणी साठवत नाही. त्याचप्रमाणे, संतवृत्तीचे लोक स्वतःला प्राधान्य न देता, आपले जीवन लोकांच्या कल्याणासाठी समर्पित करून, नेहमी इतरांच्या सेवेसाठी तत्पर असतात. शतकानुशतके आपल्या ऋषीमुनींनी आपल्याला शिकवण दिली आहे की, वैयक्तिक कर्तृत्वापेक्षा मानवतेच्या कल्याणासाठी समर्पित जीवन अधिक महत्त्वाचे आहे. पूजनीय अशोक सिंघलजींचे जीवन या भावनेचे एक सद्गुणी उदाहरण आहे.

27 सप्टेंबरपासून आपण दिवंगत अशोक सिंघलजींची जन्मशताब्दी साजरी करत आहोत. एका महान व्यक्तिमत्त्वाचा सन्मान करण्याची ही एक अनोखी संधी आहे. त्यांनी आध्यात्मिक साधना, सांस्कृतिक जागृती आणि समर्पणाने समाजाचे आणि संस्थेचे कार्य पुढे नेले.

कै. अशोकजींसोबत दीर्घकाळ काम करण्याची, त्यांच्याकडून शिकण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची आणि त्यांचा स्नेह अनुभवण्याची संधी मिळणे, हे माझे सौभाग्य आहे. मला 1981 सालचा एक प्रसंग आठवतो. त्यावेळी मी एक तरुण कार्यकर्ता म्हणून संघटनेने माझ्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत होतो. तेव्हा मला अशोकजींचे एक हस्तलिखित पत्र मिळाले. त्यांनी मला एका आगामी महत्त्वाच्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली आणि माझ्यावर काही जबाबदाऱ्या सोपवल्या. त्यावेळी अशोक सिंघलजींकडून पत्र मिळणे हा माझ्यासाठी एक खूप खास आणि अविस्मरणीय क्षण ठरला.

मी त्यांना अनेक दशके रात्रंदिवस काम करताना पाहिले. ते देशाच्या दुर्गम भागांमध्ये लांबचा आणि अनेकदा खडतर प्रवास करत असत. त्यांना विशेषतः गुजरातच्या आदिवासी भागांना भेट द्यायला आवडत असे. समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांसाठी आणखी काय करता येईल यावर ते सतत विचार करत असत. ज्या ज्यावेळी देशावर नैसर्गिक संकट येत असे त्या त्यावेळी अशोक सिंहल जी एक तर सर्वात आधी तिथे पोहोचणाऱ्यांपैकी होते किंवा ते बाधित लोकांना साहाय्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत असत. वर्ष 2001

दिवंगत अशोकजींसोबत दीर्घकाळ काम करण्याची, त्यांच्याकडून शिकण्याची, त्यांच्याशी संवाद साधण्याची आणि त्यांचा स्नेह अनुभवण्याची संधी मिळणे, हे माझे सद्भाग्य आहे.

पंतप्रधानांचा लेख वाचण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.



प्रयागराज येथे बालपण व्यतीत केलेले अशोक जी तासनतास संगम घाटावर बसत असत. नदीबद्दल त्यांचे आकर्षण स्वाभाविक होते. तिथे येणाऱ्या साधू-संत आणि भाविकांबद्दल त्यांना खूप आत्मीयता वाटत असे.

मध्ये कच्छ येथे आलेल्या भूकंपानंतर मला आलेला त्यांचा अनुभव खरोखर अविस्मरणीय ठरला आहे.

आदरणीय अशोकजी यांचा जन्म एका अत्यंत प्रतिष्ठित आणि श्रीमंत घराण्यात झाला होता. त्यांचे वडील, महावीरजी, एक प्रशासक म्हणून सुप्रसिद्ध होते. त्यांचे एक भाऊ, बी. पी. सिंहल, पोलीस अधिकारी झाले आणि नंतर खासदार बनले. दुसरे भाऊ, व्ही. पी. सिंहल, त्रिपुरा राज्याची स्थापना झाल्यावर त्रिपुराचे मुख्य सचिव झाले. कुटुंबातील इतर सदस्यांनीही व्यापार आणि कृषी क्षेत्रात यश मिळवले. मात्र अगदी सुरुवातीपासूनच अशोकजींचा कल पूर्णपणे वेगळ्या दिशेने होता. अगदी लहानपणापासूनच त्यांच्या वागण्यात इतरांबद्दलची विलक्षण करुणा आणि सेवाभाव दिसून येत होता. भारताचे पुनरुत्थान व्हावे आणि भारतमातेच्या मुलांनी गौरवशाली कामगिरी करावी, अशी त्यांची इच्छा होती. प्रयागराज येथे बालपण व्यतीत केलेले अशोक जी तासनतास संगम घाटावर बसत असत. नदीबद्दल त्यांचे आकर्षण स्वाभाविक होते. तिथे येणाऱ्या साधू-संत आणि भाविकांबद्दल त्यांना खूप आत्मीयता वाटत असे. यामुळे भारताच्या सांस्कृतिक मूल्यांविषयीची त्यांची समज अधिक समृद्ध झाली. समाजासाठी योगदान देण्याचा त्यांचा निर्धारही अधिक दृढ झाला. इतरांसाठी जगण्याची हीच तळमळ त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे घेऊन आली. त्यांच्यावर आलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी उत्साह, शिस्त आणि कर्तव्यनिष्ठेने पार पाडली.

अशोक सिंहल यांनी आपले अथक परिश्रम आणि निरंतर प्रयत्नांनी अनेक संस्था आणि आंदोलनांना बळकटी दिली. ते आपल्या ओघवत्या भाषणाने आणि अप्रतिम वक्तृत्वशैलीने संपूर्ण सभेला मंत्रमुग्ध करत असत. आपल्या बरोबरच्या कार्यकर्त्यांबद्दल त्यांना खूप प्रेम वाटत असे. त्यांच्या संपर्कात येणारा प्रत्येक जण त्यांच्या साधेपणाने प्रभावित होत असे. संतवर्गासोबत त्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. देशभरातील संत आणि ऋषीमुनींमध्येही त्यांना अत्यंत आदराचे स्थान होते. संत त्यांच्या सल्ल्याला महत्त्व देत आणि मोठ्या आदराने त्यांचे म्हणणे ऐकत असत.

माझ्या मनात अशा दोन प्रसंगांच्या आठवणी ताज्या होतात, ज्यांतून अशोक सिंहल जी यांचे अद्वितीय व्यक्तिमत्त्व जाणून घेता येईल. पहिला प्रसंग 1993 मधील आहे, जेव्हा स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो येथील ऐतिहासिक भाषणाला 100 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 'विश्व हिंदू परिषदे'ने अमेरिकेत एक संमेलन आयोजित केले होते. परदेशात अशा प्रकारच्या संमेलनाचे आयोजन करण्याची दूरदृष्टी, त्याचे नियोजन आणि विविध घटकांना एकत्र आणण्याची क्षमता यांतून अशोक जी यांची संघटनात्मक प्रतिभा दिसून आली.





आज अयोध्येत जे भव्य राममंदिर उभे आहे, त्यामागे अशोकजींसारख्या महान व्यक्तिमत्त्वांचे निःस्वार्थ समर्पण आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले.

दुसरे उदाहरण सन 2000 मधील आहे. त्यावेळी त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील 'पोर्ट ऑफ स्पेन' येथे 'जागतिक हिंदू परिषद' आयोजित करण्यात आली होती. मी त्यावेळी तिथे उपस्थित होतो. अशोक सिंहल यांच्या उपस्थितीमुळे इतर प्रतिनिधींमध्ये किती प्रचंड उत्साह संचारला, हे मी प्रत्यक्ष पाहिले. माझ्या भाषणानंतर त्यांनी व्यक्त केलेले कौतुकाचे शब्द माझ्यासाठी अत्यंत हृदयस्पर्शी ठरले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये किती प्रचंड ऊर्जा निर्माण होत असे, हे मी पुन्हा एकदा अनुभवले.

रामजन्मभूमी आंदोलनातील अशोक सिंहल यांच्या ऐतिहासिक भूमिकेचा उल्लेख केल्याशिवाय त्यांचा कोणताही उल्लेख अपूर्ण आहे. 1991 मधील बोट क्लब येथील सभेतील त्यांचे प्रभावी भाषण कोण विसरू शकेल? किंवा आंदोलनाच्या परमोच्च काळात रक्तबंबाळ आणि जखमी झालेल्या अशोक सिंहल यांची ती ऐतिहासिक प्रतिमा कोण स्मृतीतून पुसून टाकू शकेल? आज अयोध्येत एक भव्य राम मंदिर उभे आहे, आणि हे शक्य करण्यासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतलेल्या अशोक सिंहल यांच्यासारख्या निस्वार्थ व्यक्तींच्या समर्पणामुळेच शक्य झाले आहे. जर अशोक सिंहल आज आपल्यात असते, तर अयोध्येतील राम मंदिर पाहून ते अत्यंत भावूक आणि आनंदित झाले असते.

अशोक सिंहल यांना प्रगल्भ दूरदृष्टीचे वरदान होते. समाजात सलोखा आणि बंधुभावाचा प्रबळ संदेश असावा, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी सामाजिक ऐक्य आणि समानतेसाठी अथक परिश्रम घेतले. समाजात कोणत्याही प्रकारचा भेदभाव होता कामा नये, प्रत्येक व्यक्ती समान प्रतिष्ठा आणि आदरास पात्र आहे, असा त्यांचा दृढ विश्वास होता. याच कारणामुळे अयोध्येत राममंदिराची पहिली वीट ठेवण्याबाबत त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होती. हे पवित्र कार्य बिहारमधील विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आणि वंचित समाजाचे सदस्य असलेल्या कामेश्वर चौपाल यांच्या हस्तेच व्हावे, असा त्यांनी आग्रह धरला. काशी येथील एका धर्मसभेत त्यांनी डोम राजा यांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांच्यासोबत अनेक सामुदायिक मोहिमांमध्ये काम केले.

राष्ट्रउभारणी बरोबरच अशोक सिंहलजींची आणखी दोन आवडती क्षेत्रे होती, जी त्यांच्या हृदयाच्या अत्यंत जवळची होती. ती म्हणजे शिक्षण (विशेषतः वैदिक शिक्षण) आणि संगीत. या दोन्ही क्षेत्रांविषयी त्यांना अतिशय जिव्हाळा होता. वाराणसीचा खासदार म्हणून मला याचा अत्यंत अभिमान वाटतो की, ज्या शाश्वत काशीचे मी प्रतिनिधित्व करतो, त्या काशीने अशोक सिंहलजींच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी काशी हिंदू विद्यापीठातून (बीएचयू) शिक्षण घेतले होते आणि एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती. दुर्गम गावांमध्ये, विशेषतः जनजातीय समुदायांपर्यंत मूलभूत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य करणाऱ्या एकल विद्यालयाच्या उपक्रमाशीही ते सखोलपणे जोडलेले होते. ते जितके गाढे अभ्यासक आणि उत्साही वाचक होते, तितकेच उत्तम श्रोतेही होते. युवा कार्यकर्त्यांना पुस्तके वाचण्यासाठी ते नेहमीच प्रोत्साहित करत असत.

आदरणीय अशोक जी यांच्या जवळच्या परिचितांना माहित असेल की ते किती सुंदर गात असत. मला नागपूर मधील त्या सभा आठवतात ज्यामध्ये ते 'एकल गीत' गायचे. त्यांच्या गायनाने सर्वजण मंत्रमुग्ध होत असत आणि संपूर्ण बैठकीत एक नवी ऊर्जा संचारत असे. 2015 मध्ये त्यांच्या 90व्या जन्मदिनानिमित्त आयोजित सोहळ्याचा एक व्हिडिओ खूप व्हायरल झाला होता. या व्हिडिओमध्ये त्यांनी 'हे मातृभूमी मेरी, हे पितृभूमी मेरी' हे गीत गाऊन सर्वांना आश्चर्यचकित केले होते.

अशोक सिंहल यांनी आपल्या जीवनात प्रत्येक क्षणी राष्ट्राच्या प्रगतीचेच स्वप्न पाहिले. त्यांच्या आदर्श मूल्यांमुळे आपल्याला आजही प्रेरणा मिळते. त्यांच्या जन्मशताब्दीच्या या पवित्र प्रसंगी अधिकाधिक तरुणांना त्यांचे उदात्त व्यक्तिमत्त्व आणि महानतेची कल्पना यावी त्यादिशेने आपण कार्य केले पाहिजे. चला, आपल्या राष्ट्रासाठी आणि देशवासीयांसाठी अशोक सिंहलजींची स्वप्ने साकार करण्याचा संकल्प आपण पुन्हा एकदा दृढ करूया. ■

राष्ट्रीय एकात्मता दिवस

आवरण कथा

एक भारत-श्रेष्ठ भारत

सांस्कृतिक एकीकरणापासून ते व्यवस्थेच्या एकात्मीकरणापर्यंत



एकता हा राष्ट्र आणि समाजाच्या अस्तित्वाचा आधार असतो. समाजात जोपर्यंत एकता टिकून आहे, तोपर्यंत राष्ट्राची अखंडता सुरक्षित असते. त्यामुळे विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी एकता हा सर्वोच्च आणि मूलभूत आधार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 31 ऑक्टोबर 2015 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवडिया येथील पवित्र भूमीतून 'एक भारत-श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. त्यावेळी हा उपक्रम म्हणजे भाषा, संस्कृती आणि परंपरा यांच्या आदान-प्रदानाचा एक प्रयत्न एवढेच वाटत होते. मात्र, गेल्या दशकाहून अधिक काळात हीच भावना शासनव्यवस्थेचा आत्मा बनली आहे. ज्याप्रमाणे सरदार पटेलांनी सुमारे साडेपाचशे संस्थाने एका झेंड्याखाली एकत्र आणली, त्याच विचारसरणीने आता करप्रणाली, शिधावाटप, निवृत्तीवेतन, संविधान, परीक्षा आणि संशोधन यांसारखे अनेक उपक्रम 'एक राष्ट्र, एक प्रणाली'चे आधारस्तंभ बनले आहेत.

यावर्षी 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिनानिमित्त, देश सरदार पटेल यांच्या 150 व्या जयंतीचा दोन वर्षांचा राष्ट्रीय सोहळा साजरा करत आहे. चला, 'एक भारत-श्रेष्ठ भारत' हा सांस्कृतिक एकतेचा मंत्र धोरणनिर्मितीचा आणि नागरिकांच्या सुलभ जीवनाचा पाया कसा बनला आहे, हे जाणून घेऊया.

उत्तर प्रदेशातील 'एक राष्ट्र, एक शिधापत्रिका' योजनेचे लाभार्थी वृंदावन चौरसिया यांच्या कुटुंबात पाच सदस्य आहेत. ₹माझ्या कुटुंबातील पाचही सदस्यांसाठी शिधापत्रिका आहे आणि ती थेट रास्त भाव दुकानाशी जोडलेली आहे. मला दर महिन्याला शिधा मिळतो. मी 'एक राष्ट्र, एक शिधापत्रिका' योजनेचा लाभार्थी आहे.₹ असे ते सांगतात. यामुळे मला देशातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून शिधा मिळवता येतो. यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आभारी आहे. 'एक राष्ट्र, एक शिधापत्रिका' योजनेचे आणखी एक लाभार्थी, कृष्ण कुमार मौर्य, सांगतात की त्यांच्याकडे पाच युनिट्सचे कार्ड आहे. मला दर महिन्याला तांदूळ आणि गहू मिळतो. मला कोणतीही अडचण येत नाही ते म्हणतात की, 'एक राष्ट्र, एक रेशन कार्ड' योजनेमुळे मला देशात कुठेही हे धान्य मिळू शकते. ही सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार मानतात. स्थलांतरित मजुरांसाठी हे एक वरदान आहे. हे त्यांच्यासाठी जीवनरक्षक ठरत आहे. आता प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला देशात कुठेही आणि कोणत्याही रास्त भाव धान्य दुकानातून रेशन मिळू शकते.

राज्ये अनेक, राष्ट्र एक,
पंथ अनेक, ध्येय एक,
बोली अनेक, स्वर एक,
भाषा अनेक, भावना एक,
रंग अनेक, तिरंगा एक,
समाज अनेक, भारत एक,
चालीरीती अनेक, संस्कार एक,
कार्ये अनेक, संकल्प एक,
मार्ग अनेक, उद्दिष्ट एक,
चेहरे अनेक, हास्य एक.
याच एकतेच्या मंत्रासह देशाने पुढे वाटचाल करावी!

हा बदल एक देश – एक रेशन कार्ड (वन नेशन – वन रेशन कार्ड) या योजनेमुळे झाला. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत सर्व नागरिकांना अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने ही योजना 2019 मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेची संपूर्ण संकल्पना मोबाईल नंबर पोर्टेबिलिटीसारखीच आहे. जसे मोबाईल नंबर न बदलता ऑपरेटर बदलता येतो, त्याचप्रमाणे आता लाभार्थ्याला नवीन रेशनकार्ड न बनवता देशातील कोणत्याही ठिकाणाहून आपल्या हक्काचे रेशन मिळवता येते.

सर्व शिधावाटप कार्ड आधार कार्डशी जोडून आणि रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक पॉइंट-ऑफ-सेल मशीन बसवणे यामुळे ही पोर्टेबिलिटी शक्य झाली. ही योजना विशेषतः उपजीविकेच्या शोधात इतर राज्यांमध्ये स्थलांतर करणाऱ्या लाखो स्थलांतरित मजुरांसाठी तयार करण्यात आली होती. आता, त्यांना त्यांच्या मूळ राज्याप्रमाणेच देशातील कोणत्याही राज्यात त्यांचे हक्क मिळू शकतात.

वृंदावन चौरसिया आणि कृष्ण कुमार मौर्य यांच्यासारखे लाखो स्थलांतरित मजूर आणि छोटे कामगार आहेत, ज्यांच्यासाठी ही छोटी तांत्रिक सोय आत्मसन्मान आणि विश्वासाची बाब आहे. ही त्या मोठ्या चित्राची केवळ एक झलक आहे, ज्यामध्ये भारताने गेल्या दशकाहून अधिक काळात आपल्या विखुरलेल्या व्यवस्थांना एक-एक करून एकाच सूत्रात गुंफण्यास सुरुवात केली आहे.

महात्मा गांधी म्हणायचे, ₹विविधतेत एकता जपण्याच्या आपल्या क्षमतेची सतत परीक्षा घेतली जाईल. ही परीक्षा आपण कोणत्याही परिस्थितीत उत्तीर्ण होत राहिले पाहिजे.'गेल्या 12 वर्षांत, भारताने विविधतेत एकता साधण्याच्या प्रत्येक प्रयत्नात यश मिळवले आहे. सरकारने आपल्या धोरणांमधून आणि निर्णयांतून एक भारताची भावना सातत्याने अधिक दृढ केली आहे.

आज 'एक देश – एक ओळख' (आधार), 'एक देश – एक कर' (जीएसटी), 'एक देश – एक वीज ग्रीड', 'एक देश – एक रेशन कार्ड' आणि 'एक देश – एक आरोग्य विमा' यांसारख्या एकात्मिक व्यवस्थांनी देशाला एका सूत्रात जोडले आहे. आता देश 'एक देश – एक निवडणूक' या दिशेने काम करत आहे, ज्यामुळे भारताच्या लोकशाहीला नवी बळकटी मिळेल. भारत आज 'एक देश – एक नागरी संहिता', म्हणजेच धर्मनिरपेक्ष नागरी संहितेच्या दिशेनेही वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून ही घोषणा केली. मुळात, सामाजिक ऐक्य ही सरदार पटेलांचीही प्रेरणा आहे. यामुळे विविध सामाजिक वर्गांना भेडसावणाऱ्या भेदभावाला दूर करण्यास आणि देशाची एकता अधिक दृढ करण्यास मदत होईल.

एक भावना जी बनली लोककल्याणाचे धोरण

या संपूर्ण प्रवासाचा पाया 31 ऑक्टोबर 2015 रोजी घातला गेला. सरदार पटेल, ज्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुत्सद्देगिरी आणि दृढनिश्चयाच्या जोरावर जवळपास साडेपाचशे संस्थानांचे एकत्रीकरण करून आजच्या भारताचा नकाशा साकारला होता, त्यांच्या जयंतीदिनी पंतप्रधान मोदी यांनी 'राष्ट्रीय एकता दिना'च्या कार्यक्रमात 'एक भारत-श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचा शुभारंभ केला. याचा मूळ उद्देश होता, राज्ये, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय मंत्रालये, शैक्षणिक संस्था आणि सामान्य जनता यांच्यात भाषा, साहित्य, संस्कृती आणि परंपरांच्या थेट देवाणघेवाणीद्वारे एक अशी निरंतर प्रक्रिया सुरू करणे जी देशाची एकता व अखंडता अधिक मजबूत करेल.

> *कोणत्याही समाजाची ताकद त्याच्या एकतेमध्ये असते. म्हणूनच, मजबूत राष्ट्राचे समर्थक एकतेच्या या भावनेची प्रशंसा करतात आणि त्यासाठी प्रयत्नरत असतात. त्यामुळे, देशाची एकता आणि अखंडता ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

शिक्षण मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत, प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाची दुसऱ्या एखाद्या राज्यासोबत जोडी बनवून सांस्कृतिक दौरे, भाषा शिबिरे, विद्यार्थी-शिक्षक आदान-प्रदान आणि विविध महोत्सव आयोजित केले जाऊ लागले. या माध्यमातून तामिळनाडूतील एका विद्यार्थ्याला पंजाबची परंपरा जवळून अनुभवता आली तर आसाममधील युवक गुजरातच्या गरब्यात सहभागी होऊन तिथल्या मातीचा सुगंध अनुभवू लागला. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि सांस्कृतिक महोत्सव या उपक्रमाचा भाग बनले, ज्यामुळे 'विविधतेतील एकता' हे केवळ पाठ्यपुस्तकातील एक वाक्य न राहता मुलांसाठी एक प्रत्यक्ष अनुभव बनले.

कालांतराने, या उपक्रमात आणखी अनेक आयम जोडले गेले. 'पर्यटन पर्व' दरम्यान देशाच्या विविध भागांमध्ये स्थानिक संस्कृती व शिल्पकलेचा प्रसार करणे, विद्यापीठांमध्ये 'मातृभाषा गौरव' यांसारखे कार्यक्रम आयोजित करणे आणि सरकारी कार्यक्रमांमध्ये विविध भाषा व बोलीभाषांना स्थान देणे. या सर्वांमागील उद्देश हाच होता की, एकता ही एखादी भाषा किंवा संस्कृती थोपवल्यामुळे नाही, तर विविधतेचा स्वीकार केल्याने येते, ज्याप्रमाणे सरदार पटेलांनी विविध संस्थानांची स्वतंत्र ओळख कायम राखत त्यांना एकाच ध्वजाखाली एकत्र आणले होते.

मात्र, एका सांस्कृतिक प्रयोगाच्या जे सुरु झाले ते हळूहळू एका सर्वसमावेशक विचारसरणीत रूपांतरित झाले. यामागील मूळ विचार असा होता की, जर 'भारतीय असणे' ही एक सामायिक ओळख असेल, तर शासनाच्या मूलभूत व्यवस्थाही प्रत्येक नागरिकासाठी समान असायला हव्यात. राज्य, भले तो कुठलेही राज्य, भाषा किंवा



भारताच्या एकतेचे
चार आधारस्तंभ

सांस्कृतिक एकता
भारताच्या हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरा, तीर्थ, उत्सव, योग आणि सांस्कृतिक देवाणघेवाण देशाला एकत्र बांधून ठेवणारी ऊर्जा आहे.

भाषिक एकता
शेकडो भाषा आणि बोली भारताच्या विविधतेची ताकद मानून सर्व भारतीय भाषांना सन्मान आणि प्रोत्साहन देणे



भेदभाव-मुक्त विकास- गरीबी, असमानता आणि भेदभाव हे सामाजिक एकता कमकुवत करणारे घटक मानून प्रत्येक नागरिकापर्यंत विकास आणि पायाभूत सुविधा पोहोचतील याची सुनिश्चिती करणे.

संपर्क व्यवस्थेच्या माध्यमातून मने जोडणे- रस्ते, रेल्वे, महामार्ग, हवाई संपर्क आणि डिजिटल नेटवर्कच्या माध्यमातून भौगोलिक अंतर कमी करणे आणि लोकांमधील संपर्क वाढवणे

पार्श्वभूमीचा असेल. याचाच परिणाम म्हणून, पुढील काही वर्षांमध्ये हा दृष्टिकोन एकापाठोपाठ एक मोठ्या महत्त्वपूर्ण संरचनात्मक सुधारणांमध्ये बदलू लागला.

विकास आणि विश्वासाची एकता 'एक भारत'चा आधार

मागील 12 वर्षांमध्ये सरदार पटेल यांचे स्वप्न साकार करताना केंद्र सरकारने एका अशा एकात्मिक व्यवस्थेचा पाया घातला आहे, जिथे सर्व नागरिक राज्यांच्या सीमांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीयत्वाच्या भावनेने जोडले जात आहेत. ही भारताप्रति, सरदार पटेल यांच्या असाधारण योगदानाप्रति देशवासियांची कार्यांजली आहे. अशक्य वाटणारी कामेही शक्य करता येतात, हे त्यांच्या दूरदृष्टीने आपल्याला शिकवले आहे. जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा जगात असे काही लोक होते, जे भारत विखुरला जाईल असे भाकित करत होते. शेकडो संस्थानांचे एकत्रीकरण करून एकसंध भारत निर्माण होऊ शकेल याबाबत लोकांना जराही आशा नव्हती. मात्र, सरदार पटेल यांनी ते करून दाखवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दांत सांगायचे तर, हे शक्य झाले कारण सरदार पटेल हे व्यवहारात यथार्थवादी... संकल्पात सत्यवादी, कृतीत मानवतावादी... आणि ध्येयात राष्ट्रवादी होते.

आज जेव्हा भारत भाषांबद्दल बोलत आहे, तेव्हा त्या चर्चेतही एकतेचा एक मजबूत धागा दिसून येतो. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय भाषांमधून शिक्षण देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. केंद्र सरकारने मराठी, बंगाली, आसामी, पाली आणि प्राकृत या भाषांना 'अभिजात भाषेचा' दर्जा दिला आहे. भाषेप्रमाणेच, देशभरात सध्या सुरू असलेले संपर्क व्यवस्थेची कामेही देशाची एकता मजबूत करत आहेत.

रेल्वे असो, रस्ते असो, महामार्ग असोत किंवा इंटरनेट, या आधुनिक पायाभूत सुविधांनी गावाला शहरांशी जोडले आहे. जेव्हा काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांची राजधानीची शहरे रेल्वेने जोडली जातात, जेव्हा लक्षद्वीप आणि अंदमान-निकोबार बेटे पाण्याखालून जाणाऱ्या केबल्स आणि जलद इंटरनेटद्वारे जोडली जातात जेव्हा डोंगराळ भागातील लोक मोबाईल नेटवर्कशी जोडले जातात, तेव्हा विकासाच्या शर्यतीत मागे पडल्याची भावना संपुष्टात येते. 'सबका साथ, सबका विकास' हा आता सुशासनाचा मंत्र बनला आहे. विकास आणि विश्वासाची हीच एकता 'एक भारत-श्रेष्ठ

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

एक भारत, श्रेष्ठ भारत

संस्कृतीकडून राष्ट्रीय एकात्मतेपर्यंत

सुरूवात: 31 ऑक्टोबर 2015

- सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 140व्या जयंती दिनी म्हणजेच राष्ट्रीय एकता दिनी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा मूळ उद्देश विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये भाषा, साहित्य, संस्कृती आणि परंपरांची देवाणघेवाण वाढवणे हा होता.
- विविध राज्यांच्या जोड्या बनवून सांस्कृतिक दौरे, भाषा शिबिरे, विद्यार्थी-शिक्षक आदान-प्रदान , महोत्सव तसेच प्रश्नमंजुषा आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. देशातील एका भागातील नागरिक दुसऱ्या भागात केवळ नकाशांच्या माध्यमातूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून जावेत.
- कालांतराने, या उपक्रमाचे रूपांतर एका व्यापक दृष्टिकोनात झाले. विविधता जपत एकता बळकट करण्याच्या कल्पनेने पुढे जाऊन व्यवस्थांच्या एकीकरणाचा पाया रचला.
- भाषिक एकतेसाठी भारतीय भाषांमध्ये शिक्षण आणि भाषा -संवर्धन.
- सौराष्ट्र-तमिळ संगमम आणि काशी-तमिळ संगमम यांसारखे सांस्कृतिक कार्यक्रम.
- आंतरराष्ट्रीय योग दिनाद्वारे सांस्कृतिक संपर्क.

काशी-तमिळ संगमम

वर्ष 2022 मध्ये पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन झालेल्या 'काशी-तमिळ संगमम'ने (केटीएस) सांस्कृतिक सेतूचा पाया रचला, जो आतापर्यंत आयोजित केलेल्या चार आवृत्त्यांमधून अधिक मजबूत होत गेला आहे. हा उपक्रम आता तमिळनाडू आणि काशी यांच्यातील सांस्कृतिक व शैक्षणिक भागीदारीच्या रूपात विकसित झाला आहे.

- केटीएस 1.0 मध्ये एक व्यापक सांस्कृतिक अनुभव. केटीएस 2.0 मध्ये विस्तारित लोक सहभाग आणि विषयाधारित सहभाग. केटीएस 3.0 हे ज्ञान-केंद्रित. केटीएस 4.0 मध्ये संगम तमिळ भाषा शिकण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.

सौराष्ट्र-तमिळ संगमम: सौराष्ट्र-तमिळ संगममचे आयोजन 2023 मध्ये करण्यात आले. सौराष्ट्र-तमिळ संगमम गुजरात आणि तमिळनाडू यांच्यातील सामायिक संस्कृती आणि वारशाचा उत्सव बनला. या 10 दिवसीय महोत्सवात सौराष्ट्रातील 3,000 हून अधिक तमिळ रहिवाशांनी सहभाग घेतला.



युवा संगम: याचा सातवा टप्पा सध्या सुरू असून, यामध्ये तरुणांना शैक्षणिक सहलींवर जाण्याची संधी मिळत आहे.

भाषा संगम: ॲपचा उद्देश नागरिकांना विविध भारतीय भाषांशी अवगत करणे आणि शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

भारत'च्या उभारणीला गती देत आहे.

चार स्तंभांवर भारताच्या एकतेचे अनुष्ठान

विकसित विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकता हा सर्वोच्च पाया आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः या एकतेचे चार महत्त्वपूर्ण अनुष्ठान निर्धारित केले आहेत, ज्यावर देश निरंतर काम करत आहे.

एकतेचा पहिला स्तंभ आहे सांस्कृतिक एकता. ही भारताची संस्कृतीच आहे जिने हजारो वर्षांपासून राजकीय परिस्थितीपेक्षा विपरीत भारताला एक राष्ट्र म्हणून अमर ठेवले आहे. बारा ज्योतिर्लिंगे,

एक राष्ट्र, एक वेळ

परदेशी उपग्रह-आधारित काल-स्त्रोतांवरील अवलंबित्व कमी होईल

27 ऑगस्ट 2026 रोजी ग्राहक व्यवहार विभागाने 'भारतीय प्रमाण वेळ नियम, 2026' अधिसूचित केले. हे नियम राजपत्रात प्रकाशित झाल्यापासून 180 दिवसांनी अंमलात येतील. संपूर्ण देशभरात कायदेशीर, प्रशासकीय, व्यावसायिक आणि अधिकृत उद्देशांसाठी भारतीय प्रमाणवेळ' (**IST**) समान प्रमाणवेळ म्हणून निश्चित केली जाईल.

- 'एक राष्ट्र, एक वेळ' या उपक्रमामुळे भारतीय वेळ प्रसार पायाभूत सुविधांसाठी परदेशी उपग्रह-आधारित काल-स्त्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल.
- सामायिक काल-संदर्भामुळे बँकिंग आणि डिजिटल व्यवहारांची अचूक काळ-नोंद करणे शक्य होईल.
- यामुळे रेल्वे, विमानतळ, दूरसंचार, इंटरनेट आणि वीज प्रणाली यांच्यात अधिक चांगला समन्वय साधण्यास मदत होईल.
- सरकारी आणि कायदेशीर नोंदी, तसेच आपत्कालीन आणि वेळेचे महत्त्व असलेल्या इतर सेवांच्या समन्वयातही सुधारणा होईल.



> *काशी-तमिळ संगमम' आणि 'सौराष्ट्र-तमिळ संगमम' हे उपक्रम सांस्कृतिक देवाणघेवाणीचे चैतन्यमय व्यासपीठे बनले आहेत. भारताच्या 'विविधतेतील एकते'चा उत्सव साजरा करत असतानाच, हे उपक्रम विविध परंपरा, भाषा आणि समुदायांना एकत्र आणतात.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

सात पवित्र नगरे, चार धाम, पन्नासहून अधिक शक्तिपीठे आणि तीर्थयात्रेची परंपरा—ही ती प्राण ऊर्जा आहे, जी भारताला एक चैतन्यशील राष्ट्र बनवतात. हीच परंपरा आज 'सौराष्ट्र-तमिळ संगमम' आणि 'काशी-तमिळ संगमम' यांसारख्या आयोजनातून पुढे नेली जात आहे. 'आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या माध्यमातून भारताच्या महान योगशास्त्रालाही नवी ओळख मिळत आहे. भारताचा योग आज लोकांना जोडण्याचे एक माध्यम बनत आहे.

एकतेचा दुसरा स्तंभ आहे-भाषिक एकता : भारतातील शेकडो भाषा आणि बोली या देशाच्या मुक्त आणि रचनात्मक विचारांचा पुरावा आहेत. येथे कोणत्याही समाजाने, सत्तेने किंवा संप्रदायाने भाषेचा कधीही शस्त्र म्हणून वापर केलेला नाही. एखादी भाषा थोपण्याचा प्रयत्न झाला नाही. त्यामुळेच भाषिक विविधतेच्या बाबतीत भारत जगातील एक अत्यंत समृद्ध देश बनला आहे. भारतीय भाषांनी संगीतातील विविध सुरांप्रमाणेच देशाची ओळख अधिक सशक्त केली आहे. याच कारणामुळे सध्याचे सरकार प्रत्येक भाषेला 'राष्ट्रीय भाषा' मानते. भारताकडे तमिळसारखी जगातील सर्वात जुन्या भाषांपैकी एक भाषा आहे, संस्कृतसारखा ज्ञानाचा वारसा आहे. आज भारतातील प्रत्येक भाषेला प्रोत्साहन दिले जात आहे, जेणेकरून प्रत्येक मुलाला स्वतःच्या मातृभाषेत शिक्षण घेता येईल. तसेच, भारतीयांना देशातील अन्य भाषांची ओळख व्हावी आणि त्यातून त्यांना शिकता यावे, यासाठीही प्रयत्न केले जात आहेत; जेणेकरून या भाषा राष्ट्राच्या एकतेच्या सूत्रधार बनतील.

एकतेचा तिसरा स्तंभ आहे- भेदभाव मुक्त विकास : गरीबी गरीबी आणि भेदभाव या सामाजिक व्यवस्थेतील सर्वात मोठ्या उणिवा

एक भारत, श्रेष्ठ भारत च्या बळकटीकरणाचे सूत्र



खाद्य महोत्सव - खाद्य परंपरा : जोडीदार राज्यांच्या खाद्यसंस्कृतीची परस्परांना ओळख करून देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यामुळे सहभागींना आपल्या जोडीदार राज्यांतील खास पदार्थांची चव चाखता येते आणि तेथील खाद्यसंस्कृतीची माहितीही मिळते.

संस्कृतीची देवाणघेवाण: भारताची संस्कृती आणि सण-उत्सवांची ओळख करून देण्यासाठी या संकल्पनेअंतर्गत विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये वेगवेगळ्या राज्यांत सण कसे साजरे केले जातात आणि त्यांचे काय महत्त्व आहे, याची माहिती दिली जाते. तसेच, विविध राज्यांतील पारंपरिक प्रथा आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडवले जाते.

युवा महोत्सव: राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील निवडक संस्थांमार्फत युवा महोत्सव आयोजित केले जातात. यामध्ये संबंधित राज्यातील तसेच जोडीदार राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाते.

एक भारत, श्रेष्ठ भारत क्लब: देशभरातील शैक्षणिक संस्थांमध्ये 'एक भारत, श्रेष्ठ भारत क्लब' स्थापन करण्यात आले आहेत. या क्लबच्या माध्यमातून या मोहिमेचा संदेश पोहोचवला जातो. तसेच, दर महिन्याला 'एक भारत, श्रेष्ठ भारत दिवस' साजरा केला जातो.

शैक्षणिक देवाणघेवाण: या उपक्रमांतर्गत शैक्षणिक संस्था आपापसात संबंधित विषयांवर चर्चा करतात. चर्चासत्र (सेमिनार) आणि दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून चर्चासत्र (वेबिनार) आयोजित करण्यासोबतच जोडीदार राज्यातील संस्थांना भेटीही दिल्या जातात.

खेळांचे आयोजन: 'एक भारत, श्रेष्ठ भारत' अंतर्गत क्रीडा उपक्रम आयोजित केले जातात. तरुणांमध्ये संघभावना विकसित व्हावी, यासाठी यात सांघिक खेळांवर भर दिला जातो. तसेच, पारंपरिक खेळांना प्राधान्य दिले जाते.

आहेत. परकीय आक्रमकांनी नेहमीच या उणिवांचा लाभ उचलला आहे. म्हणूनच सरदार पटेल यांना देशातील गरिबीविरुद्ध दीर्घकालीन योजनेवर काम करायचे होते. त्यांनी एकदा म्हटले होते की, जर भारताला 1947 ऐवजी 10 वर्षे आधीच स्वातंत्र्य मिळाले असते, तर 1947 पर्यंत भारत अन्नधान्याच्या टंचाईच्या संकटातून मुक्त झाला असता. केंद्र सरकार आज सरदार पटेल यांची ही अपूर्ण स्वप्ने आणि संकल्प पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. गेल्या 12 वर्षांत देशातील 25 कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे. आज कोट्यवधी

पर्यटन देवाणघेवाण : यामध्ये जोडीदार राज्यांतील प्रमुख पर्यटनस्थळे आणि आकर्षणांची माहिती एकमेकांना दिली जाते. यासाठी ऐतिहासिक स्मारके आणि पर्यटनस्थळांची माहिती प्रसारित केली जाते. तसेच, सहल आयोजकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केले जातात आणि पर्यटकांना स्थानिक घरगुती निवास व्यवस्थेत (होम स्टे) राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यास प्रोत्साहन दिले जाते.

पुस्तकांचे भाषांतर: याअंतर्गत जोडीदार राज्यांच्या भाषांतील पुस्तके आणि पर्यटन पुस्तिकांचे एकमेकांच्या भाषांमध्ये भाषांतर केले जाते. यामुळे त्या राज्यांचे साहित्य आणि पर्यटनविषयक माहिती समजून घेणे सोपे होते.

जोडीदार राज्याची भाषा शिकणे: 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या उपक्रमाचा उद्देश लोकांना जोडीदार राज्यांच्या भाषांची ओळख करून देणे हा आहे. यामुळे त्यांना त्या राज्यांतील लोकांशी प्राथमिक स्वरूपात संवाद साधता येतो. तसेच, मातृभाषेबरोबरच इतर भारतीय भाषाही शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

- समान अर्थाच्या म्हणी शिकवल्या जातात. तसेच, गीतांचे भाषांतर केले जाते आणि दररोज एका वाक्याचे 22 भारतीय भाषांमध्ये भाषांतर केले जाते.

सहल आणि शिबिर (टूर-कॅम्प): जोडीदार राज्यांमध्ये शिबिरे आणि सहलींचे आयोजन केले जाते.

उत्सव महोत्सव: महोत्सवांचे आयोजन करुन त्यामध्ये जोडीदार राज्यांना निमंत्रित केले जाते.



आता प्रत्येक राज्याला मिळू शकणार राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळ्याचे यजमानपद भूषवण्याची संधी

राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी आणखी एक नवा उपक्रम

- **आयोजन स्थळामध्ये ऐतिहासिक बदल:** आतापर्यंत केवळ दिल्लीतच होणारा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळा आता देशातील प्रमुख पर्यटनस्थळांवरही आयोजित करण्याची नवी सुरुवात झाली आहे.
- **गुजरातच्या केवडियातून सुरुवात:** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 22 सप्टेंबर 2026 रोजी गुजरातच्या केवडिया येथील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' येथून याचा शुभारंभ केला.
- **'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश:** आधुनिक भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यासमोर चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कामगिरीचा गौरव आणि भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा सन्मान करणे, म्हणजेच 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या संकल्पनेला मूर्त रूप देणे होय.
- **राज्यांना यजमानपदाचे आमंत्रण:** माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यांना आपल्या प्रमुख पर्यटनस्थळांसह राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे यजमानपद भूषवण्यासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन केले आहे. यातून निवडलेल्या राज्यात पुढील पुरस्कार सोहळा आयोजित केला जाईल.
- **पर्यटन आणि राष्ट्रीय एकात्मता यांना प्रोत्साहन:** कला, संस्कृती आणि पर्यटन यांच्या या संगमामुळे क्षेत्रीय विकास आणि पर्यटन यांना गती तर मिळेलच, सोबतच देशही एकात्मतेच्या सूत्रात बांधला जाईल.

गरीब कुटुंबांना हक्काचे घर मिळत आहे. प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचत आहे आणि मोफत उपचारांची सुविधाही उपलब्ध होत आहे. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगता यावे, हेच आज देशाचे ध्येय आणि निर्धार आहे. भेदभाव आणि भ्रष्टाचाराला थारा न देणारी ही धोरणे राष्ट्रीय एकात्मता अधिक बळकट करत आहेत.

राष्ट्रीय एकात्मतेचा चौथा स्तंभ आहे- संपर्क व्यवस्थेने मने जोडणे. आज देशात विक्रमी संख्येने महामार्ग आणि द्रुतगती मार्ग उभारले जात आहेत. वंदे भारत आणि नमो भारत यांसारख्या गाड्यांमुळे भारतीय रेल्वेत मोठे बदल घडत आहेत. छोटी शहरेही आता विमानसेवेने जोडली जात आहेत. या आधुनिक पायाभूत

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

एक देश-एक कर
आर्थिक एकीकरणाचे नवे युग

एक देश-एक कर- जीएसटी

सुरुवात: 1 जुलै 2017



- वस्तू आणि सेवा कराने देशातील 17 कर आणि 13 उपकर एकाच कर व्यवस्थेत सामावून घेतले.
- व्यापार करताना वेगवेगळ्या राज्यांच्या करसीमांमुळे येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि संपूर्ण भारताला एका सामायिक बाजारपेठेच्या रूपात जोडणे, हा यामागचा उद्देश होता. यामुळे करप्रणाली समजून घेणे आणि तिचे पालन करणे अधिक सोपे झाले.
- केंद्र आणि राज्यांना एकत्र आणणारी जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) परिषद या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनली.
- जीएसटी 2.0 अर्थात पुढील पिढीतील जीएसटी सुधारणांमध्ये प्रामुख्याने करांचे दर बदलून 5 टक्के आणि 18 टक्के असे दोन मुख्य दर निश्चित करण्यात आले.

जीएसटी नोंदणीकृत करदाते


2026 **1.65** कोटी

2017 **66.5** लाख

एकात्मतेचे सूत्र

नऊ वर्षांत, जीएसटीने भारताचा 'एक भारत - श्रेष्ठ भारत' हा दृष्टिकोन बळकट केला आहे. जीएसटीने 17 वेगवेगळे कर आणि 13 उपकर एका सामान्य चौकटीत सामावून घेतले.

एक देश, एक फास्टॅग



प्रारंभ- देशभरातील टोल वसुलीची पद्धत एकसमान आणि इलेक्ट्रॉनिक करण्यासाठी २०१९ मध्ये सुरुवात झाली. त्यानंतर, फेब्रुवारी 2021 मध्ये राष्ट्रीय महामार्गांवरील सर्व टोल नाक्यावरील सर्व मार्गिकांवर फास्टॅग सुविधा बसवून त्याद्वारेच टोलवसुली अनिवार्य करण्यात आली.

- देशभरातील महामार्गांवरील प्रवास अधिक सुरळीत आणि वेगवान झाला आहे. टोल नाक्यांवरील रांगा कमी झाल्या असून इंधनाचीही बचत होत आहे.
- खासगी कार, जीप आणि व्हॅनसाठी 15 ऑगस्ट 2025 पासून 3,075 चा वार्षिक पास सुरू करण्यात आला. हा पास एक वर्ष किंवा 200 वेळा टोल नाका ओलांडण्यापर्यंत वैध आहे.
- आता 'वन टॅग' ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. यामुळे वाहनावरील सध्याचा फास्टॅग कायम ठेवून तो देणारी बँक बदलता येते. या सुविधेमुळे फास्टॅग वापरणाऱ्यांना अधिक सोयी आणि पर्याय उपलब्ध झाले आहेत.

98

टक्क्यांहून अधिक वापर आणि सुमारे 13 कोटी वापरकर्त्यांसह फास्टॅगने देशातील इलेक्ट्रॉनिक पद्धतीने टोल वसुलीच्या व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणला आहे.



एकात्मतेचे सूत्र

देशभरात एकाच फास्टॅगद्वारे पथकर (टोल) भरता येतो. अनेक ठिकाणी वाहनतळाचे (पार्किंग) शुल्कही फास्टॅगद्वारे भरता येते. यामुळे वेगवेगळ्या राज्यांत टोल भरण्याची प्रक्रिया सुलभ झाली असून, टोल शुल्काच्या बाबतीतही एकसमान व्यवस्था निर्माण झाली आहे.

सुविधांमुळे भारताची जगातील प्रतिमा बदलत आहे. यामुळे उत्तर ते दक्षिण, पूर्व ते पश्चिम, असे देशातील अंतरही कमी झाले आहे. लोकांमधील थेट संपर्क आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळत आहे. या दिशेने टाकलेले हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. गेल्या 12 वर्षांत भारतात झालेल्या डिजिटल क्रांतीमुळे राष्ट्रीय एकात्मतेला नवी ताकद मिळाली आहे.

जेव्हा देश एका सुरात व्यवसायाची भाषा बोलला

> *एकतेचा अभाव नवीन संकटांना आमंत्रण देतो, तर सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून देश प्रगतीची नवी शिखरे गाठतो. सर्वांच्या प्रयत्नांना स्वतंत्र भारताच्या उभारणीत जेवढे महत्त्व होते, त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्व स्वातंत्र्याच्या या अमृतकाळात त्यांना प्राप्त झाले आहे*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



या बदलाचे सर्वात मोठे आणि सर्वाधिक चर्चिले गेलेले उदाहरण म्हणजे वस्तू आणि सेवा कर-जीएसटी. कित्येक दशके भारतातील प्रत्येक राज्याची स्वतंत्र करव्यवस्था होती. एखादा ट्रक एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाताना तपासणी नाक्यावर त्याला तासनतास थांबावे लागत असे. वेगवेगळे करदर आणि कागदपत्रांची गुंतागुंत यामुळे व्यापार करणेही अवघड होते. एखादी वस्तू एका राज्यातून दुसऱ्या राज्यात गेली की तिच्या किमतीत बदल होत असे. व्यापाऱ्यांनाही प्रत्येक राज्यासाठी वेगळा हिशोब ठेवावा लागत असे. लहान दुकानदारांपासून ते मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वांनाच या गुंतागुंतीच्या करव्यवस्थेचा सामना करावा लागत होता.

अशा परिस्थितीत 1 जुलै 2017 रोजी 101 वी घटनादुरुस्ती लागू झाल्यानंतर देशाच्या करव्यवस्थेत मोठा बदल झाला. 'एक देश – एक कर' या संकल्पनेनुसार वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू करण्यात आला. त्यामुळे उत्पादन शुल्क, सेवा कर, मूल्यवर्धित कर (व्हॅट), जकात अशा अनेक अप्रत्यक्ष करांचा समावेश एका करव्यवस्थेत करण्यात आला. आता एकाच जीएसटी नोंदणी क्रमांकाच्या आणि ऑनलाइन कर विवरणपत्राच्या आधारे व्यावसायिकांना देशभरात आपला व्यवसाय करणे सोपे झाले आहे. देशाच्या कोणत्याही भागात माल पाठवण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांच्या करव्यवस्थांचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. यामुळे केवळ व्यवसाय करणे सोपे झाले नाही, तर संपूर्ण भारत एकसमान बाजारपेठ बनला. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना एकत्र आणून निर्णय घेणारी जीएसटी परिषद (वस्तू आणि सेवा कर परिषद) ही 'सहकारी संघराज्य व्यवस्थे'चे उत्तम उदाहरण ठरली आहे. या परिषदेत सर्व राज्यांना आपले मत मांडण्याची संधी मिळते. करांचे दर ठरवण्यापासून ते करसवलती देण्यापर्यंतचे निर्णय केंद्र आणि राज्ये एकत्रितपणे घेतात.

जेव्हा दूर झाली पेन्शनमधील तफावत निर्माण झाली समान व्यवस्था

कित्येक दशकांपासून देशातील माजी सैनिकांची एक प्रमुख मागणी होती. समान पदावर आणि समान कालावधीपर्यंत सेवा केलेल्या सर्व सैनिकांना समान निवृत्तीवेतन मिळावे. ही मागणी म्हणजेच 'वन रँक वन पेन्शन' (ओआरओपी – एक पद, एक निवृत्तीवेतन). पूर्वी जो सैनिक आधी निवृत्त झाला, त्याला कमी निवृत्तीवेतन मिळत असे. त्याच पदावरून काही वर्षांनी निवृत्त झालेल्या सैनिकाला मात्र जास्त निवृत्तीवेतन मिळत असे. दोघांनीही देशासाठी समान काळ सेवा केली आणि सारखेच धोके पत्करले असले, तरी त्यांच्या पेन्शनमध्ये फरक होता. पेन्शनमधील ही तफावत माजी सैनिकांच्या मनात अनेक

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

सामाजिक कल्याण
सुरक्षिततेची एकीकृत व्यवस्था

एक देश-एक शिधापत्रिका

सुरुवात: 2019

81 कोटींपेक्षा अधिक लाभार्थ्यांना मोफत धान्य उपलब्ध केले जात आहे.

- स्थलांतरित मजूर आणि इतर ठिकाणी काम करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी स्वस्त शिधा सुविधा फिरत्या स्वरूपात उपलब्ध करण्याची व्यवस्था.
- आता लाभार्थी, नवी शिधापत्रिका न बनवताच देशात अन्य ठिकाणीही आपल्या वाट्याचा शिधा घेऊ शकतात.
- आधार संलग्न ओळख आणि रास्त दर धान्यांच्या दुकानांवर इलेक्ट्रॉनिक पॉईंट ऑफ सेल मशिनमुळे ही पोर्टेबिलिटी शक्य झाली आहे.



एकतेचे सूत्र
नागरिक जिथे काम करत असतील, तिथे त्यांना अन्न सुरक्षा अधिकाराचा लाभ मिळावा.

एक श्रेणी, एक निवृत्तीवेतन (OROP)



सुरुवात: 2015

- समान श्रेणी आणि समान सेवा काळ असलेल्या माजी सैनिकांसाठी समान निवृत्तीवेतनाची व्यवस्था.
- याचा उद्देश, वेगवेगळ्या वेळी सेवानिवृत्त झालेल्या समान श्रेणीच्या सैनिकांसाठी असलेल्या निवृत्तीवेतनातील विसंगती दूर करणे हा आहे.
- 25 लाखांपेक्षा अधिक माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना या योजनेचा लाभ मिळाला.

एकतेचे सूत्र: देशाची सेवा करणाऱ्या सैनिकांना सन्मान आणि निवृत्तीवेतन व्यवस्थेत समानतेची भावना.

एक देश, एक आरोग्य विमा'

(आयुष्मान भारत) च्या दिशेने ऐतिहासिक पाऊल

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित अशा 40 टक्के कुटुंबांना द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या रुग्णालयात दाखल झाल्यास, प्रती वर्ष, प्रती कुटुंबाला पाच लाख रुपयांपर्यंतची मोफत आरोग्यसेवा प्रदान केली जाते.

- सप्टेंबर 2018 साली ही योजना सुरू झाल्यापासून, 22 सप्टेंबर 2026 पर्यंत,

48.57 कोटींपेक्षा अधिक आयुष्मान कार्ड जारी करण्यात आली आहेत.



दशकांपासून घर करुन होती आणि कित्येक वेळा

2014 साली केंद्रात नवीन सरकार आल्यानंतर 2015 साली सरकारने ही प्रलंबित मागणी मंजूर करुन, 'एक श्रेणी, एक निवृत्तीवेतन' योजना लागू केली. या योजनेचा उद्देश, सेवाकाळातील फरक विचारात न घेता समान पद आणि समान सेवा काळ असलेल्या सर्व माजी सैनिकांना, ते कोणत्याही वर्षी

13+ कोटी

रुग्णांना रुग्णालयात दाखल करून उपचार देण्यात आले. यामुळे, सर्वसामान्य नागरिकांच्या 2+ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची बचत झाली.

- 30+ लाखांहून अधिक रुग्णांना इतर राज्यांतील रुग्णालयांमध्ये उपचार घेण्याची मंजुरी मिळाली. यासाठीची एकूण रक्कम 8,800 कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे.
- आयुष्मान भारत वय वंदना योजनेअंतर्गत 1.20 कोटी ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी करण्यात आली आहे.

एकतेचे सूत्र

निरोगी भारत हा विकसित भारताचा आधार आहे. यासाठी देशातील सर्व नागरिकांना समान आरोग्य सुविधांचा लाभ मिळणे आवश्यक आहे.



(22 सप्टेंबर 2026 पर्यंतची आकडेवारी)



एक देश-एक आरोग्य नोंद

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या (**NHA**) माध्यमातून 'आयुष्मान भारत डिजिटल मिशन' (**ABDM**) अंतर्गत 'एक नागरिक, एक डिजिटल आरोग्य नोंद' या दिशेने ठोस कार्य करण्यात आले आहे. देशातील प्रत्येक नागरिकाची सुरक्षित, कागदविरहित आणि एकात्मिक डिजिटल आरोग्य नोंद तयार करणे, हा यामागील उद्देश आहे.

महत्वपूर्ण कामगिरी आणि आकडेवारी...

आभा (ABHA) आयडी'ची निर्मिती: प्रत्येक नागरिकाला 14 अंकी विशिष्ट ओळख क्रमांक देण्यासाठी 96 कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती तयार करण्यात आली आहेत.

डिजिटल आरोग्य नोंदींची जोडणी: 110 कोटींहून अधिक आरोग्य नोंदी (प्रयोगशाळेचे अहवाल, औषधोपचारांची चिठ्ठी, लसीकरणाची माहिती, रुग्णालयातून डिस्चार्ज देतानाचा सारांश इत्यादी) आभा खात्याशी जोडण्यात आल्या आहेत.

संमतीवर आधारित माहितीची देवाणघेवाण: यामुळे रुग्ण स्वतःच्या संमतीने देशाच्या कोणत्याही भागातील डॉक्टरांना पूर्वीच्या आरोग्य नोंदी दाखवू शकतात. त्यामुळे अनावश्यक चाचण्या आणि कागदी फाइल्सचा त्रास कमी झाला आहे.

एकतेचे सूत्र - आता देशात कुठेही उपचार घेतले तरी आरोग्य नोंदी डिजिटल स्वरूपात उपलब्ध होतील. एका क्लिकवर आरोग्य नोंदी उपलब्ध असतील.

निवृत्त झालेले असले, तरीही समान पेन्शन मिळावी, एखाद्या सुभेदाराने 1985 मध्ये सेवा सोडली असो किंवा 2010 मध्ये, आता दोघांचेही निवृत्तीवेतन एकाच निकषानुसार निश्चित केले जाते. अनेक पिढ्यांपासून सैनिक कुटुंबांच्या चर्चेचा विषय राहिलेली ही विसंगती अखेर दूर झाली. नव्या एकात्मिक व्यवस्थेद्वारे देशाने स्पष्ट संदेश दिला की आता त्यांच्या सेवेचे

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

शिक्षण-परीक्षा-भरती
युवा सामर्थ्याची एकात्मिक शक्ती





एक देश-एक परीक्षा (एनटीए)

सुरुवात: 2017 पासून, 2026 मध्ये बदल

- राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या स्थापनेमुळे राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा एकाच सामायिक, तंत्रज्ञानाधारित व्यवस्थेअंतर्गत घेण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.
- वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी **NEET** ही एकमेव राष्ट्रीय प्रवेश परीक्षा करण्यात आली.
- केंद्र सरकारने राष्ट्रीय परीक्षा एजन्सीसह इतर सार्वजनिक परीक्षा सुरक्षित आणि अधिक चांगल्या पद्धतीने आयोजित करण्याबाबत सूचना देण्यासाठी नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय कृती दलाची स्थापना केली आहे. या उच्चस्तरीय कृती दलाने सर्व संबंधित घटकांकडून सूचना मागवल्या आहेत.

एकतेचे सूत्र

विद्यार्थ्यांच्या संधी त्यांच्या राज्याच्या किंवा शिक्षण मंडळाच्या मर्यादांपलीकडे जाऊन राष्ट्रीय परीक्षा मंचावर निश्चित व्हाव्यात.

एक देश-एक भरती

केंद्रीय मंत्रिमंडळाने ऑगस्ट 2020 मध्ये मंजूर केलेली राष्ट्रीय भरती संस्थेची स्थापना हे 'एक देश, एक भरती' या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

- **राष्ट्रीय भरती संस्थेची स्थापना:** केंद्र सरकारने विविध विभाग, मंत्रालये आणि सार्वजनिक उपक्रमांमधील अराजपत्रित पदांसाठी (श्रेणी ब आणि क) उमेदवारांची प्राथमिक छाननी करण्यासाठी स्वायत्त यंत्रणा म्हणून राष्ट्रीय भरती संस्थेची स्थापना करण्यास मंजुरी दिली.
- **मुख्य भरती यंत्रणांचे एकत्रीकरण:** प्रारंभीच्या टप्प्यात **CET** ने एसएससी, रेल्वे भरती मंडळ आणि बँकिंग कार्मिक निवड संस्था, अशा तीन मुख्य भरती संस्थांच्या प्राथमिक परीक्षांची जागा घेतली.

एक देश-एक सब्सक्रिप्शन (ONOS)

अलीकडेच सुरू झालेली योजना

- देशातील सरकारी शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधकांना राष्ट्रीय सदस्यत्वाच्या माध्यमातून आघाडीची आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिके उपलब्ध करून देण्याची व्यवस्था.
- या योजनेसाठी 3 वर्षांच्या कालावधीत 6,000 कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आहे.

एकतेचे सूत्र

कोणासाठीही ज्ञान मिळवणे, ही त्या संस्थेची आर्थिक क्षमता आणि भौगोलिक स्थितीवर अवलंबून असू नये.



मूल्यमापन दोन वेगवेगळ्या मापदंडांवर केले जाणार नाही.

एक देश, एक विधान, एक संविधान

एकीकरण एकात्मीकरणाच्या या प्रवासातील सर्वात ऐतिहासिक अध्याय 5 ऑगस्ट 2019 रोजी लिहिला गेला. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरला कलम 370 अंतर्गत विशेष घटनात्मक दर्जा प्राप्त होता. त्यामुळे भारतीय संविधानातील अनेक तरतुदी तेथे पूर्णपणे लागू होत नव्हत्या आणि तेथील रहिवाशांना देशाच्या इतर भागांतील नागरिकांप्रमाणे काही अधिकारही मिळत नव्हते. इतकेच नव्हे,

शासनाची घटनात्मक व्यवस्था

शासनाचे एकात्मीकरण

एक देश-एक संविधान

कलम 370 मधून मुक्तता

निर्णायक बदल: 5 ऑगस्ट 2019



- जम्मू-काश्मीरशी संबंधित घटनात्मक व्यवस्थेत बदल केल्यानंतर 'एक देश, एक संविधान' या संकल्पनेला नवे परिमाण लाभले.
- जम्मू-काश्मीर आणि लडाख यांची केंद्रशासित प्रदेश म्हणून पुनर्रचना करण्यात आली आणि केंद्राचे कायदे व व्यवस्था लागू करण्याच्या चौकटीत बदल करण्यात आला.

एकतेचे सूत्र

एक देश, एक विधान, एक संविधान हे स्वप्न साकार झाले. नागरिकांचे अधिकार आणि घटनात्मक व्यवस्था यांना समान राष्ट्रीय चौकटीशी जोडण्यात आले.

एक देश-एक निवडणूक प्रस्तावित व्यवस्था

विधेयक: डिसेंबर 2024

- लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची संकल्पना.
- सप्टेंबर 2023 मध्ये माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली.
- या समितीच्या शिफारशींच्या आधारे डिसेंबर 2024 मध्ये संबंधित घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले.

सद्यस्थिती: हा कायदा अद्याप झालेला नाही. हे विधेयक संयुक्त संसदीय समितीच्या विचाराधीन आहे.

एकतेचे सूत्र : निवडणूक

प्रक्रिया एका चक्रात आणण्याचा प्रस्ताव, ज्यामुळे देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी होतील. निवडणुकीचा खर्च कमी होईल आणि वारंवार लागू होणाऱ्या निवडणूक आचारसंहितेमुळे विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होणार नाहीत.

एक देश, एक नागरी संहिता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून केलेल्या भाषणात सांगितले होते की "ज्या नागरी संहितेनुसार आपण जगत आहोत, ती खरे तर भेदभाव करणारी नागरी संहिता आहे.

- संविधानाची भावना आणि सर्वोच्च न्यायालयही समान नागरी कायदा आणण्यास सांगते. संविधान निर्मात्यांचे जे स्वप्न होते, ते पूर्ण करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.
- या गंभीर विषयावर देशात चर्चा व्हावी, व्यापक चर्चा व्हावी. आता देशाची हीच गरज आहे की देशात एक धर्मनिरपेक्ष नागरी संहिता असावी. आपल्याला धर्मनिरपेक्ष नागरी संहितेच्या दिशेने वाटचाल करावी लागेल.

एकतेचे सूत्र: धर्मनिरपेक्ष समान नागरी संहिता अस्तित्वात आल्यास देशात धर्माच्या आधारावर होणाऱ्या भेदभावातून आणि सामान्य नागरिकांमध्ये निर्माण होणाऱ्या दुराव्याच्या भावनेतून मुक्तता मिळेल. एकता आणि 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही भावना अधिक बळकट होईल.

तर इतर राज्यांतील नागरिकांना तिथे मालमत्ता खरेदी करण्याचे अधिकार नव्हते, जे देशाच्या इतर भागांत सर्वसामान्यपणे उपलब्ध आहेत. अशा प्रकारे अनेक दशकांपासूनच्या या आव्हानावर तोडगा काढत भारतीय संसदेने 5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 निष्प्रभ करून 'एक देश, एक विधान, एक संविधान' या मूलभूत भावनेची पुनर्स्थापना केली. या ऐतिहासिक निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही नंतर शिक्कामोर्तब केले.

स्वातंत्र्यानंतर सात दशकांनी देशात एक राष्ट्र-एक संविधान हा

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

रस्ते, रेल्वे आणि इंटरनेट
अंतर दूर करणे आणि संवाद साधणे



एक राष्ट्र, एक ओळख -आधार

- ही जगातली सर्वात मोठी डिजिटल ओळख प्रणाली असून बायोमेट्रिक आणि लोकसांख्यिकी डेटावर आधारित डिजिटल ओळख प्रदान करते.
- यूपीआय, डिजिलॉकर, उमंग ॲप, ई-स्वाक्षरीसह देशाच्या सर्व सुविधा या डिजिटल ओळखीशी जोडलेल्या आहेत.

144 कोटींहून अधिक आधार (एक राष्ट्र, एक ओळख) क्रमांक जारी करण्यात आले आहेत.

एक देश- एक गॅस ग्रीड

- एक राष्ट्र - एक गॅस ग्रीडचे उद्दिष्ट प्रत्येक घरात एलपीजी आणि वाहनांसाठी सीएनजीची अखंड कनेक्टिव्हीटी उपलब्ध करणे हे आहे.
- 2014 पूर्वीच्या 27 वर्षात केवळ 15 हजार किलोमीटर गॅस पाईपलाईन्स घालण्यात आल्या होत्या.
- देशभरात जवळपास 34,233 किलोमीटर पाईपलाईन घालण्यासाठी संस्था नेमण्यात आल्या आहेत. यापैकी 25,429 किलोमीटर पाईपलाईन जून 2025 पर्यंत सुरू झाल्या आहेत.
- गॅसची पोहोच आणि जोडण्या वाढल्यामुळे अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश रॉकेलमुक्त झाले आहेत.



एक राष्ट्र, एक ग्रीड

- 'एक राष्ट्र, एक वीज ग्रीड, एक फ्रिक्वेन्सी' अभियान, लेह-लद्दाखच्या जोडणीसह फेब्रुवारी 2019 मध्ये पूर्ण झाले.
- हे एकाच फ्रिक्वेन्सीवर चालणारे जगातले सर्वात मोठे वीज ग्रीड आहे. सुमारे 1.70 लाख सर्किट किलोमीटर इतक्या पारेषण वाहिन्यांची भर घालण्यात आली आहे.

1.12 लाख मेगावॅट वीज वहन क्षमता विकसित.

देशाच्या प्रत्येक भागात विजेशी पुरेशी आणि निरंतर उपलब्धता सुनिश्चित केली जात असून वीज वाया जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

एक राष्ट्र, एक प्रवास कार्ड

संपूर्ण देशात मेट्रो, बस, कॅब, मोनोरेल आणि सर्व शहरी रेल्वेमध्ये नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) जारी केले जात आहे.

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मार्च 2019 मध्ये वाहतूक सुलभतेसाठी एक राष्ट्र, एक कार्ड उपक्रमाचा प्रारंभ केला. नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डवर आधारित ही स्वदेशी स्वयंचलित प्रवासीभाडे संकलन प्रणाली, देशातली अशा प्रकारची पहिलीच प्रणाली आहे.
- ग्राहक या एकाच कार्डचा वापर मेट्रो, बस, उपनगरी रेल्वे, टोल, पार्किंग,स्मार्ट सिटी आणि किरकोळ खरेदीसह सर्व क्षेत्रातल्या देयकांसाठी करू शकतात.

संकल्प पूर्ण झाला असून कृतज्ञ राष्ट्राकडून सरदार पटेल यांच्या आत्म्याला वाहिली जाणारी ही सर्वात मोठी आदरांजली आहे. संपूर्ण देशात 70 वर्षे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान लागू झाले नव्हते, तिथे विधानसभा निवडणुकांमध्ये पहिल्यांदाच कोणताही भेदभाव न करता मतदान झाले. जम्मू काश्मीरमध्ये मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यानंतर 75 वर्षांनी भारताच्या संविधानाची शपथ घेतली.

कनेक्टिव्हिटीसाठी रेल्वे, रस्ते, महामार्ग आणि डिजिटल नेटवर्क

रस्ते आणि महामार्ग

63.73 लाख किमी सह भारताचे रस्त्यांचे जाळे जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

राष्ट्रीय महामार्गांची लांबी

2013-14 — **91,287** किमी

मार्च 2026 — **1,46,572** किमी

सुमारे 61% वाढ




रेल्वे सेवा

- भारतीय रेल्वेतून ऑगस्ट 2026 मध्ये 67.27 कोटी प्रवाशांनी प्रवास केला.
- भारताचे एकूण ब्रॉड गेज रेल्वे जाळे 99.6 % विद्युतीकृत आहे.
- जुलै 2026 मध्ये देशातली पहिली स्वदेशी हायड्रोजन फ्युएल सेल ट्रेन सुरू झाली.
- मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल कॉरिडॉर (508 किमी) प्रकल्प पूर्ण होणार असून तिचा नियोजित वेग ताशी 350 किमी आहे.

डिजिटल कनेक्टिव्हीटी

- देशात इंटरनेट सबस्क्रायबरची संख्या वाढून ती 109.2 कोटींहून अधिक झाली आहे. वायरलेस डेटाच्या किमतीत घट होऊन ती 7.51 रुपये प्रति जीबी आहे.
- **भारतनेट परियोजना :** देशातील ग्रामपंचायतींना जोडण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या या योजनेअंतर्गत, 2.21 लाखांहून अधिक ग्रामपंचायतींना सेवेसाठी सज्ज करण्यात आले आहे.
- **फायबर आणि 5जी नेटवर्क:** देशभरात अंदाजे 7 लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे आणि 99.9% जिल्ह्यांमध्ये 5जी सेवा उपलब्ध आहे.



एकतेचे सूत्र : आपण देशात कुठेही राहत असलो तरी आता हायवे-एक्सप्रेसवेसह हायस्पीड ट्रेन, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणापर्यंत, एका संस्कृतीपासून दुसऱ्या संस्कृतीपर्यंत पोहोचवतात. डिजिटल कनेक्टिव्हिटीनेही अंतर कमी केले असून गावेही आता फायबर नेटवर्कने जोडली आहेत.

162 वंदे भारत, 2 वंदे भारत स्लीपर आणि 72 अमृत भारत सेवांमुळे कनेक्टिव्हिटी आणि प्रवास सुविधा अधिक चांगल्या झाल्या.



आता देशातल्या प्रत्येक भागात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत एकच संविधान, एकच कायदा व्यवस्था आणि नागरिकांना समान अधिकार प्राप्त आहेत. शिवाय, गेल्या 12 वर्षांत भारताने राष्ट्रीय एकात्मतेला धोका असलेल्या अनेक समस्यांचे निराकरण केले आहे. भारताकडे वाकड्या नजरेने पाहिले तर भारत आपल्याला सोडणार नाही, हे दहशतवाद्यांचे

राष्ट्रीय एकात्मता दिवस
मुखपृष्ठ कथा

शेतकरी सक्षमीकरण
गावे आणि शेतकऱ्यांसाठी एकात्मिक व्यवस्था

एक देश, एक खत
भारत ब्रँडसह एक नवी सुरुवात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 17 ऑक्टोबर 2022 रोजी 'भारतीय जन उर्वरक(खते) परियोजना -एक राष्ट्र एक उर्वरक'चा प्रारंभ करून भारत युरिया बॅगचे अनावरण केले.

- आता, देशभरात विकल्या जाणाऱ्या युरियाचे एकच नाव, एकच गुणवत्ता आणि एकच ब्रँड असेल: 'भारत'.



एक राष्ट्र, एक कृषी बाजार

राष्ट्रीय कृषी बाजार म्हणजेच 'ई-नाम' (eNAM) ची सुरुवात एप्रिल 2016 मध्ये करण्यात आली. ई-नामच्या माध्यमातून देश 'एक राष्ट्र, एक कृषी बाजार' या संकल्पनेच्या दिशेने वाटचाल करत आहे.

- ई-नाम पोर्टलवर 1.80 कोटींहून अधिक शेतकरी आणि 2.73 लाख व्यापारी नोंदणीकृत.
- 23 राज्ये आणि 4 केंद्रशासित प्रदेशांमधील 1,656 मंडया ई-नाम प्लॅटफॉर्मशी जोडण्यात आल्या आहेत.

4.84 लाख कोटी रुपयांहून अधिक मूल्याचा

सुमारे 205 लाख मेट्रिक टन कृषी उत्पादनांचा व्यापार, ई-नामचा प्रारंभ झाल्यापासून ते मार्च 2026 पर्यंत झाला आहे.



सूत्रधार आज जाणून आहेत.

ईशान्य क्षेत्राच्या शांतता आणि समृद्धीच्या मार्गात किती मोठी संकटे होती, तरीही संवाद, विकास आणि विश्वास यांच्या माध्यमातून फुटीरतावादाची आग शांत करण्यात आली. 'बोडो करारा'मुळे आसाममधील 50 वर्षांपासूनचा वाद संपुष्टात आला. 'ब्रू-रियांग करारामुळे' हजारो विस्थापित लोक अनेक दशकांनंतर आपल्या घरी परतले. नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरासोबत झालेल्या करारामुळे दीर्घकाळापासूनची अशांतता संपुष्टात आली आहे. आसाम आणि मेघालय यांच्यातील सीमावादही बऱ्याच अंशी सोडवण्यात आला आहे.

जेव्हा 21 व्या शतकाचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा त्यात भारताने दुसऱ्या आणि तिसऱ्या दशकात नक्षलवादाच्या भयानक संकटाचे यशस्वीपणे उच्चाटन कसे केले, याविषयी एक सोनेरी अध्याय असेल. एकेकाळी नेपाळमधील पशुपतीपासून ते भारतातील तिरुपतीपर्यंत 'रेड कॉरिडॉर' पसरलेला होता. नक्षलवाद हे भारताच्या एकता आणि अखंडतेसमोरील एक मोठे आव्हान बनले होते. आज भारत नक्षलमुक्त झाला आहे.

युवा आकांक्षांना व्यवस्थेचा आधार

देशात कुठेही जन्मलेले मूल डॉक्टर-इंजिनियर होण्याचे स्वप्न पाहते. तेव्हा काही वर्षांपूर्वीपर्यंत हे स्वप्न पूर्ण होणार की नाही, ते मूल कुठल्या राज्याच्या शिक्षण मंडळातून शिकला आहे किंवा कुठल्या राज्यांच्या प्रवेश परीक्षांचे अर्ज भरू शकला आहे, यावर अवलंबून असे. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्यस्तरीय आणि खाजगी अशा अनेक परीक्षा घेतल्या जात असत; त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अर्ज भरावे लागणे, अनेक शहरांचा प्रवास करणे, वेगवेगळे शुल्क भरणे आणि मूल्यमापनाच्या भिन्न पद्धतींचा सामना करणे यांसारख्या गोष्टींना सामोरे जावे लगे. गरीब कुटुंबासाठी ही संपूर्ण प्रक्रिया एखाद्या अत्यंत कठीण पर्वतावर चढण्यासारखी असे.

ही गुंतागुंत सोडवण्यासाठी 2017 मध्ये राष्ट्रीय परीक्षा संस्थेची (एनटीए) स्थापना करण्यात आली. या संस्थेने वैद्यकीय शिक्षणासाठी

'नीट' (NEET) ही एकमेव राष्ट्रीय प्रवेश परीक्षा निश्चित केली आणि 'जेईई' (JEE) सारख्या इतर प्रमुख परीक्षांचे आयोजन केंद्रीकृत, पारदर्शक व तंत्रज्ञानावर आधारित पद्धतीने करण्यास सुरुवात केली. आता विद्यार्थी ओडिशातल्या एखाद्या सरकारी शाळेतील असो किंवा दिल्लीतील एखाद्या नावाजलेल्या खाजगी शाळेतील, त्यांची गुणवत्ता एकाच परीक्षेच्या, एकाच प्रश्नपत्रिकेच्या आणि मूल्यमापनाच्या समान निकषांच्या आधारे ठरवली जाते. एकतेची ही भावना केवळ शाळा आणि महाविद्यालयांपुरती मर्यादित न राहता शोध आणि अनुसंधान क्षेत्रापर्यंतही विस्तारली आहे. आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांच्या वर्गणीचा खर्च खूप जास्त असल्याने, देशातील सरकारी शिक्षण-संशोधन संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांना अनेकदा अद्ययावत संशोधनाची माहिती मिळण्यापासून वंचित राहावे लागत असे. या समस्येवर उपाय म्हणजे वन नेशन, वन सबस्क्रिप्शन (ONOS) योजना.

परिवर्तनाच्या या प्रक्रियेतही आव्हाने आलीच. कुठल्याही मोठ्या राष्ट्रीय बदलांप्रमाणे ही प्रक्रियादेखील अधिक चांगली करण्यासाठी निरंतर प्रयत्न सुरू आहेत. मात्र 'एक देश-एक परीक्षा', एक देश -एक भर्ती यामागील मूळ भावनेने शिक्षणात समान संधींचा एक बळकट पाया नक्कीच रचला आहे.

पुढील वाटचाल: एक देश, एक निवडणूक

एकीकरणाचा हा प्रवास अजून पूर्ण झालेला नाही. देशात दरवर्षी कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणुका होत असतात. परिणामी, प्रशासकीय यंत्रणा सतत कामात गुंतलेली असते आणि आदर्श आचारसंहितेचा परिणाम जवळपास कायम असतो. या गोष्टींचा विकासकामे आणि धोरणात्मक निर्णयांच्या गतीवर अनेकदा परिणाम होतो. वारंवार होणाऱ्या निवडणुकांच्या चक्रामुळे प्रशासनावर आणि संसाधनांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी, 'एक देश, एक निवडणूक' म्हणजेच लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे, या विचारावर दीर्घकाळापासून चर्चा सुरू आहे.

वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडण्यासोबतच सुरक्षा दले आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनाही वारंवार निवडणूक कर्तव्यावर तैनात करावे लागते. यामुळे विकासकामांच्या सातत्यावर परिणाम होतो. एकाच वेळी निवडणुका घेतल्यास हे चक्र खंडित होईल आणि सरकारांना त्यांच्या संपूर्ण कार्यकाळात स्थिर धोरणनिर्मितीवर लक्ष केंद्रित करणे शक्य होईल.

या अनुषंगाने सप्टेंबर 2023 मध्ये माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने व्यापक सार्वजनिक विचारविनिमय आणि तज्ज्ञांशी चर्चा केल्यानंतर सरकारला आपल्या शिफारशी सादर केल्या. केंद्र सरकारने 17 डिसेंबर 2024 रोजी लोकसभेत संविधान (129 वी सुधारणा) विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयक सादर केले. सध्या, सविस्तर विचारविनिमयासाठी ही विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) सोपवण्यात आली आहेत. या विषयावर संसदेत पुढील चर्चा होणे अद्याप बाकी आहे.

> *आज प्रत्येक भारतीय म्हणू शकतो: एक राष्ट्र, एक विधान. आम्ही सरदार साहेबांचे एक भारत, श्रेष्ठ भारत स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित आहोत. आपल्याला अशा व्यवस्था निर्माण कराय्च्या आहेत, ज्या देशाची एकता अधिक दृढ करतील. ही प्रक्रिया निरंतर सुरू राहायला हवी .*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

एकतेची वृद्धिंगत होत जाणारी व्याप्ती

आपल्या इथे म्हटले गेले आहे, *ऐक्यं बलं समाजस्य तद्भावे स दुर्बलः। तस्मात् ऐक्यं प्रशंसन्ति दृढं राष्ट्र हितैषिणः॥* म्हणजेच कोणत्याही समाजाची ताकद त्याच्या एकतेत असते. म्हणूनच, राष्ट्रहितैषी या एकतेच्या भावनेची प्रशंसा करतात आणि ती साधण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे, देशाची एकता आणि एकजुटता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सरदार पटेल यांना असे वाटत असे की— इतिहास लिहिण्यात वेळ दडवता कामा नये; आपण इतिहास घडवण्यासाठी कठोर परिश्रम करायला हवेत.

निश्चितपणे याच विचारातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये एक भारत-श्रेष्ठ भारत हा उपक्रम सुरू केला. त्यावेळी काही लोकांना तो केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम वाटला. मात्र, गेल्या दशकात हा विचार कर व्यवस्था , अन्नसुरक्षा, सैनिकांचा सन्मान, घटनात्मक समानता, परीक्षांच्या संधी आणि ज्ञानाची उपलब्धता अशा प्रत्येक क्षेत्रात खोलवर रुजला आहे. देशातील कोणत्याही भागातील नागरिकांसाठी एकसमान व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या मुख्य ध्येयाने हा प्रवास अविरतपणे सुरू आहे. ■



केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

रब्बी पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर फेज-III योजनेला मंजुरी

केंद्र सरकार शेतकरी कल्याण आणि नवीकरणीय ऊर्जेची उपलब्धता वाढवण्यासाठी कटिबद्ध आहे. यासाठी देश सातत्याने काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली 30 सप्टेंबर रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. तसेच, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर फेज-III योजनेसह इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम लागू करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. यामुळे शेतकरी आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी मदत मिळेल...

निर्णय : आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीने विपणन सत्र 2027-28 साठी सर्व अधिसूचित रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली.

परिणाम : एमएसपीमध्ये सर्वाधिक वाढ पीएम कुसुम योजनेसाठी जाहीर करण्यात आली आहे. ही वाढ 675 रुपये प्रति क्विंटल आहे. त्यानंतर मोहरीच्या किमतीत 413 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. मसूर, जव, हरभरा आणि गहू यांच्या किमतीत अनुक्रमे 390 रुपये प्रति क्विंटल, 136 रुपये प्रति क्विंटल, 83 रुपये प्रति क्विंटल आणि 25 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे.

- 2014-15 ते 2025-26 या कालावधीत गव्हाची खरेदी वाढून 3,715 लाख मेट्रिक टन झाली आहे.
- त्याचप्रमाणे, 2014-15 ते 2025-26 या कालावधीत रब्बीच्या सहा पिकांची खरेदी वाढून 3,921 लाख मेट्रिक टन झाली आहे.
- 2014-15 ते 2025-26 या कालावधीत गहू उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आलेली किमान आधारभूत किंमत वाढून 7.31 लाख कोटी रुपये झाली आहे.

- 2014-15 ते 2025-26 या कालावधीत रब्बीच्या सहा पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात आलेली किमान आधारभूत किंमत वाढवून 8.36 लाख कोटी रुपये करण्यात आली आहे.

निर्णय : बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिमसह आंतरराज्यीय ट्रान्समिशन सिस्टिमच्या विकासासाठी ग्रीन एनर्जी कॉरिडॉर फेज-III योजनेला मंजुरी.

परिणाम : या ऐतिहासिक उपक्रमामुळे भारताची आंतरराज्यीय ट्रान्समिशन सिस्टिम मजबूत होईल. त्यामुळे राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये 135 गिगावॅटपर्यंतची नवीकरणीय ऊर्जा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवणे शक्य होईल.

- ही योजना आर्थिक वर्ष 2032-33 पर्यंत उभारण्याचे उद्दिष्ट असून, तिचा एकूण प्रकल्प खर्च 1,86,405 कोटी रुपये आहे.
- 2035 पर्यंत 900 गिगावॅट स्थापित बिगर-जीवाश्म ऊर्जा क्षमता साध्य करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी ही योजना मदत करेल.
- ही योजना देशाच्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेतही योगदान देईल आणि कार्बन फूटप्रिंट कमी करून पर्यावरणपूरक विकासाला चालना देईल.
- यामुळे ऊर्जा क्षेत्र, उत्पादन आणि बांधकाम उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.
- एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) चे उत्पादन आणि वापर यांमुळे देशांतर्गत ऊर्जा साठवणूक उद्योगात रोजगाराच्या अतिरिक्त संधी निर्माण होतील.
- याशिवाय, सहभागी राज्यांमध्ये संचालन, देखभाल आणि ग्रिड व्यवस्थापन या क्षेत्रांत दीर्घकालीन कुशल रोजगार निर्माण होतील.



निर्णय : दिल्लीत इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम (आयटीएमएस) लागू करण्यास मंजुरी.

परिणाम : या प्रकल्पांतर्गत निश्चित केलेल्या 42 वाहतूक कॉरिडॉर्सचा समावेश केला जाईल. एआयच्या माध्यमातून वाहनांवर देखरेख ठेवली जाईल.

- ही व्यवस्था 24 महिन्यांत तीन टप्प्यांत लागू केली जाईल. त्यानंतर 5 वर्षे तिचे संचालन आणि देखभाल केली जाईल.
- नव्या व्यवस्थेत असे सिग्नल बसवले जातील, जे रस्त्यावरील वाहनांची संख्या आणि वाहतुकीची स्थिती यांनुसार आपल्या वेळेत बदल करू शकतील.
- 'एआय'च्या मदतीने चोरीच्या तसेच संशयास्पद वाहनांवर देखरेख ठेवणे सोपे होईल.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.





51,000 हून अधिक नियुक्तीपत्रांचे वितरण

तरुणांना भविष्यासाठी तयार करत आहे भारत सरकार

भारत सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरण, स्किल इंडिया मिशन, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आणि पीएम सेतू यांसारख्या योजनांच्या माध्यमातून तरुणांना केवळ भविष्यासाठी तयार करत नाही, तर त्यांना रोजगारही मिळवून देत आहे. याचाच एक भाग म्हणून 19 सप्टेंबर रोजी 51 हजारांहून अधिक तरुणांना रोजगार मेळ्यात सरकारी सेवेसाठीची नियुक्तीपत्रे देण्यात आली. 20व्या रोजगार मेळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, तुम्ही ज्या टप्प्यावर पोहोचला आहात, तिथे पोहोचण्यात तुमच्या मेहनतीबरोबरच तुमच्या आई-वडिलांची आणि कुटुंबीयांचीही तपस्या आहे...

देशाची अर्थव्यवस्था विकसित होत जाते, गुंतवणूक वाढते, नवे उद्योग सुरू होतात आणि नव्या क्षेत्रांचा विस्तार होतो, तेव्हाच तरुणांसाठी नव्या संधी निर्माण होतात. आज भारत ही वेगाने प्रगती करणारी मोठी अर्थव्यवस्था आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताचा विकासदर 7.8 टक्के राहिला आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, खासगी क्षेत्रातही रोजगाराच्या नव्या संधी वेगाने वाढाव्यात, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

याच विचारातून प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेवर सुमारे एक लाख कोटी रुपये खर्च केले जात आहेत. या योजनेच्या मदतीने सुमारे दोन कोटी तरुणांना पहिल्यांदाच कामगारवर्गाचा भाग बनण्याची संधी मिळेल. पंतप्रधान मोदी म्हणाले की, सरकार या योजनेअंतर्गत पहिल्यांदाच नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना

आतापर्यंत 12.75 लाख तरुणांना मिळाली नियुक्तिपत्रे

- हा रोजगार मेळा देशभरात 45 ठिकाणी आयोजित करण्यात आला होता.
- नवनियुक्त कर्मचारी भारत सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये रुजू होतील.
- यामध्ये महसूल विभाग, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, संरक्षण मंत्रालय इत्यादींचा समावेश आहे.
- 20व्या रोजगार मेळाव्यासह रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून विविध विभागांमध्ये आणि सरकारी संघटनांमध्ये सुमारे 12.75 लाख तरुणांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.

IGOT कर्मयोगी प्लॅटफॉर्मशी आज एक कोटी 70 लाखांहून अधिक सरकारी कर्मचारी जोडले गेले आहेत.

आज तुम्ही सर्वजण अशा वेळी भारत सरकारशी जोडले गेले आहात, जेव्हा देश एका मोठ्या उद्दिष्टाच्या दिशेने पुढे जात आहे. हे उद्दिष्ट म्हणजे 2047 पर्यंत विकसित भारत घडवणे. यामध्ये तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.


–नरेंद्र मोदी, पंतप्रधान

तरुणांना भविष्यासाठी तयार करण्यावर भर

- राष्ट्रीय शिक्षण धोरण, स्किल इंडिया मिशन, प्रधानमंत्री कौशल विकास योजना किंवा प्रशिक्षणार्थी योजनेला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न.
- पीएम-सेतू योजनेच्या माध्यमातून 60 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करून एक हजार सरकारी आयटीआयना आधुनिक बनवले जात आहेत.

15 हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदानही दिले जात आहे. नव्या रोजगारांची निर्मिती करणाऱ्या नियोक्त्यांनाही सरकार प्रोत्साहन देत आहे. म्हणजेच, देशात रोजगार वाढवण्यासाठी सरकार प्रत्येक आघाडीवर काम करत आहे.

तरुणांना सरकारी नोकऱ्या देण्यासाठी रोजगार मेळावे







सेमीकंडक्टर परिसंस्था

खुल्या होत आहेत, नवोन्मेष, गुंतवणूक आणि विकासासाठी नव्या संधी

मजबूत होणारी अर्थव्यवस्था आणि जागतिक विश्वासाच्या जोरावर भारत एक नवीन जागतिक उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भविष्यात या दिशेने सेमीकंडक्टर परिसंस्था महत्त्वाची भूमिका बजावेल. 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत आयोजित 'सेमीकॉन इंडिया 2026' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की भारताचे सेमीकंडक्टर क्षेत्र वेगाने वाढत आहे. अशात त्यांनी देशविदेशातील प्रतिभावान तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासात भागीदार होण्याचे केले आवाहन ...

सेमीकॉन इंडियाचा आरंभ 2022 मध्ये झाला. मोहाली आणि सुरत येथील दोन नवीन प्रकल्पांमध्ये व्यावसायिक उत्पादन सुरू झाले आणि आता जागतिक ग्राहकांपर्यंत चिप्स पोहोचू लागल्या. यामुळे देशात विक्रमी वेळेत चिप डिझाइन, उपकरण निर्मिती आणि चाचणी क्षमतांचा विकास झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेमीकॉन इंडिया 2026 कार्यक्रमात ही घोषणा केली आणि 13.5 अब्ज डॉलर्सच्या सेमीकंडक्टर मिशनच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली. त्यांनी नवीन नियामक सुधारणांचाही उल्लेख केला, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय कंपन्या, स्टार्टअप्स आणि डिझाइन कंपन्यांमधील सहकार्याला चालना मिळेल.



गेल्या 15 दिवसांतील कामगिरी...


3,000 किलोमीटर लांबीच्या विशेष मालवाहतूक कॉरिडॉरचा आरंभ

- 7.8% दराने पहिल्या तिमाहीत वाढला जीडीपी
- ब्रिक्स दिल्ली जाहीरनाम्याचा सदस्य राष्ट्रांनी एकमताने केला स्वीकार
- मुंबईमध्ये झाला ग्लोबल फिनटेक फेस्ट. यात एजेंटिक एआय आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वसमावेशक वित्तपुरवठ्यावर झाली चर्चा.

पीएम मोदींचे खास कथन...

20% हून अधिक होत आहे सेमीकंडक्टर बाजारपेठेची वाढ. गेल्या दोन वर्षांमध्ये या वाढीचे मोठे कारण एआयमुळे निर्माण झालेली मागणी आहे.

- एक लाख अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची सरकारची महत्त्वाकांक्षी योजना, ज्यापैकी 70,000 विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण
- 60 गिगावॅटपेक्षा जास्त सौर ऊर्जा क्षमता, जी एका दशकापूर्वी जेमतेम 2 गिगावॅट होती.





सेमीकंडक्टर परिसंस्था उभारण्यासाठी अनेक दशके लागतात, परंतु भारताने अल्पावधीतच लक्षणीय यश मिळवले आहे. देशाने या सर्व क्षेत्रांवर एकाच वेळी काम केले आहे.

- चिपचे आरेखन आणि उत्पादन
- उपकरणे आणि सामग्रीचा पुरवठा
- चिप चाचणी क्षमता

“भारतात संशोधन करणाऱ्या तरुण प्रतिभावंतांनी पुढे यावे. परदेशात संशोधन करणाऱ्या तरुण प्रतिभावंतांनीही भारतातील प्रगत तंत्रज्ञानाच्या विकासात सामील व्हावे.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



'उडान'ची 10 वर्षे

जोडतेही...
आत्मनिर्भर भारताला करते सशक्तही

मला हवाई चप्पल घालणारी माणसे विमानात बघायची आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उडान योजनेच्या पहिल्या उड्डाणाच्या आरंभावेळी हे शब्द उच्चारले होते... आणि आज उडानची आकडेवारी दर्शवते की 1 कोटी 66 लाखांहून अधिक लोकांनी या परवडणाऱ्या -स्वस्त हवाई सेवेचा लाभ घेतला आहे. या योजनेचा सुधारित आणि नवीन टप्पा 4 जुलै 2026 रोजी सुरू झाला. या योजनेचा उद्देश केवळ 120 नवीन ठिकाणांपर्यंत आणि 4 कोटी प्रवाशांपर्यंत पोहोचणे हाच नाही, तर यामुळे देशांतर्गत हवाई क्षेत्र आणि आत्मनिर्भर भारताला मिळेल बळकटी...

स्वातंत्र्यानंतरचे देशातील पहिले हवाई वाहतूक धोरण सध्याच्या केंद्र सरकारने तयार केले. त्यानंतर 21 ऑक्टोबर 2016 रोजी 'उडान' अर्थात 'उडे देश का आम नागरिक' या प्रादेशिक हवाई संपर्क योजनेला मंजुरी देण्यात आली. या योजनेअंतर्गत पहिल्या विमानाने 27 एप्रिल 2017 रोजी झेप घेतली. या योजनेला तिच्या आरंभापासून 10 वर्षे पूर्ण होत आहेत. या 10 वर्षांमध्ये उडान योजनेने 679 मार्ग कार्यान्वित केले आहेत. या योजनेने 95 विमानतळ, हेलिपोर्ट्स आणि जलविमानतळांना जोडून प्रादेशिक हवाई संपर्कात लक्षणीय परिवर्तन घडवले आहे. जुलै 2026 पर्यंत 16.8 दशलक्षाहून अधिक प्रवाशांना या किफायतशीर सेवेचा लाभ झाला आहे.

> *आमच्या सरकारने उडान योजनेचा आणखी विस्तार केला आहे, ज्याअंतर्गत येत्या काही वर्षांत लहान शहरांमध्ये 100 नवीन विमानतळ आणि 200 नवीन हेलिपॅड बांधण्याची योजना आहे. या योजनेने भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात परिवर्तन घडवले आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

भारताच्या आकांक्षांचा उत्सव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची 'हवाई चप्पल ते हवाई जहाज' ही दूरदृष्टी 21 ऑक्टोबर 2016 रोजी सुरू झालेल्या 'उडान' योजनेद्वारे एका राष्ट्रीय चळवळीत रूपांतरित झाली आहे. ही योजना प्रत्येक भारतीयासाठी हवाई प्रवास अधिक सुलभ करत आहे. आज 'उडान' ही केवळ एक जोडणारी योजना उरली नसून ती भारताच्या स्वप्नांचा एक उत्सव आहे, ती शेतकरी, विद्यार्थी, कारागीर आणि व्यावसायिकांना विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देत आहे. द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या शहरांपासून ते दुर्गम भागांपर्यंत हवाई वाहतूक म्हणजे आर्थिक विकास, पर्यटन, रोजगार आणि सामाजिक समावेशनाचे एक शक्तिशाली इंजिन बनले आहे.

भारताच्या हवाई वाहतूक प्रवासातील हा आणखी एक नवीन अध्याय आहे

या योजनेचे यश आणि अनुभव लक्षात घेऊन या योजनेला नवे रूप दिले, ज्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने 25 मार्च 2026 रोजी मंजुरी दिली. सुधारित उडान योजना 4 एप्रिल 2026 रोजी सुरू झाली असून ती देशभरातील श्रेणी-2 व श्रेणी-3 शहरे आणि दुर्गम भागांमध्ये प्रादेशिक हवाई संपर्काला प्रोत्साहन देईल. नागरी विमान वाहतूक-आधारित विकासाला गती देण्यासाठी पुढील दहा वर्षांत अंदाजे 29,000 कोटी रुपये खर्च केले जातील ज्यामुळे डोंगराळ, ईशान्य आणि महत्त्वाकांक्षी (एबीआय एनईआर) प्रदेशांमधील विकासाला वेग येईल. यात सध्या सेवा नसलेल्या हवाईपट्ट्यांपैकी 100 विमानतळ आणि 200 हेलिपोर्ट्सच्या विकासाचा समावेश आहे. ही योजना 'विकसित भारत 2047' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी प्रभावी प्रगती सुनिश्चित करेल. हा नवीन टप्पा शेवटच्या टप्प्यातील जोडणी अधिक मजबूत करेल आणि 'सर्वांसाठी उडान, सर्वांसाठी विकास' ही संकल्पना देशाच्या कानाकोपऱ्यात वास्तवात उतरेल, याची खात्री करेल. ■

आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटनेच्या 'नागरी हवाई वाहतुकीचे आर्थिक फायदे: समृद्धीच्या लाटा' या अभ्यासानुसार, हवाई जोडणीमध्ये खर्च केलेल्या प्रत्येक रुपयाचा अर्थव्यवस्थेवर 3.28 पट परिणाम तर रोजगारावर 6.1 पट परिणाम होतो.

आत्मनिर्भर भारत होईल अधिक मजबूत

उडान योजनेच्या नवीन टप्प्याअंतर्गत दुर्गम आणि पोहोचण्यास कठीण असलेल्या भागांसाठी दोन ध्रुव हेलिकॉप्टर आणि दोन डॉर्नियर विमानांची खरेदी केली जाईल. यामुळे लहान विमानांची कमतरता दूर होईल आणि 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांतर्गत देशाच्या हवाई वाहतूक उद्योगाला चालना मिळेल. प्रादेशिक विमान वाहतूक दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी आणि नियमित प्रवासी वाहतूक वाढवण्यासाठी या योजनेत व्हीजीएफ सहाय्याला पाच वर्षांची मुदतवाढ देण्याची तरतूद आहे.





अन्नपूर्णा योजनेचा 3,000 रुपयांचा चौथा हप्ता जारी

बंगालच्या महिलांचे नवे सामर्थ्य

पश्चिम बंगालने यावर्षी 4 मे रोजी परिवर्तनाचा एक नवा मार्ग निवडला आणि त्यामध्ये महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांचे जीवन सुलभ करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार मिळून विविध योजना लवकरात लवकर लागू करत आहेत...

घरामधील माता, भगिनींच्या खांद्यावर अनेक जबाबदाऱ्या असतात. महिला प्रत्येक प्रकारे कुटुंबाची काळजी घेतात. जेव्हा त्यांना आवश्यक खर्चांची चिंता कमी असते, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास आणखी वाढतो. याच उद्देशाने पश्चिम बंगाल सरकारने अन्नपूर्णा योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत 17 सप्टेंबर रोजी 1.5 कोटी महिलांच्या बँक खात्यांमध्ये प्रत्येकी 3,000 रुपये पाठवण्यात आले. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, हा उपक्रम बंगालमधील महिलांचा आत्मविश्वास अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. सरकारचे उद्दिष्ट आहे की एकही पात्र महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये. या पैशांचा उपयोग एखाद्या आईला आपल्या मुलाच्या शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी होऊ शकतो. एखाद्या बहिणीला औषधे किंवा घरासाठी आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी या पैशांचा आधार मिळू शकतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, बंगालमधील महिलांकडे स्वतःचे निर्णय घेण्याची शक्ती आणि पुढे जाण्याचे धैर्य असावे, अशी आमची भूमिका आहे. यामध्ये अन्नपूर्णा योजनेची मोठी भूमिका आहे.

जीवनचक्राशी संबंधित प्रत्येक समस्येच्या निराकरणास सर्वोच्च प्राधान्य

गर्भावस्थेदरम्यान पौष्टिक आहार मिळावा	मातृ वंदना योजना
मुलीला गर्भातच मारले जाऊ नये	बेटी बचाओ, बेटी पढाओ
शौचालय नसल्यामुळे मुलींनी शाळा सोडू नये	कोट्यवधी शौचालयांची निर्मिती
मुलीचे शिक्षण सुरू राहावे	सुकन्या समृद्धि योजना
मुलीला सैनिक शाळेत जायचे असल्यास संधी मिळावी	सैनिक शाळांचे दरवाजे खुले केले
मुलगी मोठी झाल्यावर स्वतःचा व्यवसाय करू शकेल	हमीशिवाय कर्ज देणारी मुद्रा योजना
आई झाल्यानंतरही महिलेला नोकरी सुरू ठेवता यावी	मातृत्व रजेच्या कालावधीत वाढ
मुलींना गावातच कमाईच्या नव्या संधी मिळाव्यात	स्वयं-सहाय्यता गट
स्वयंपाकघरात लाकडाच्या धुराचा त्रास होऊ नये	उज्ज्वला योजनेअंतर्गत गॅस जोडणी
पाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्रास सहन करावा लागू नये	हर घर नल से जल योजना
अंधारात राहावे लागू नये	सौभाग्य योजनेअंतर्गत मोफत वीज जोडणी
पैशांअभावी मुलीने स्वतःचा आजार लपवू नये	आयुष्मान कार्ड
मुलीला बँकिंग सुविधांचा लाभ मिळावा	जनधन योजना
मुलीला घराच्या मालमत्तेवरही अधिकार मिळावा	प्रधान मंत्री आवास योजना





माता, बहिणी आणि मुली यांच्या जीवनचक्राशी संबंधित प्रत्येक समस्येचे निराकरण करण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे. आपण सर्वजण मिळून एका नव्या बंगालची निर्मिती करू. विकसित बंगालच्या सामर्थ्यामुळे विकसित भारताचा संकल्प आणखी मजबूत होईल.

–नरेंद्र मोदी, पंतप्रधान

नव्या सरकारसमोरील पहिली कसोटी हीच होती की बंगालमधील महिलांचे जीवन सोपे व्हावे आणि त्यांच्या जीवनातील 'ईझ ऑफ लिविंग' म्हणजेच जीवनसुलभता वाढावी, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. म्हणूनच आम्ही जो मूलमंत्र स्वीकारला आहे, तो म्हणजे — "कोथा कॉम, काज बेशी!" अर्थात, बोलणे कमी आणि काम जास्त. अन्नपूर्णा योजनेची सुरुवात याच विचारातून झाली आहे. सरकार स्थापन झाल्यानंतर काही दिवसांतच या योजनेवर काम सुरू झाले. एवढ्या मोठ्या संख्येने महिलांच्या बँक खात्यांमध्ये पैसे पोहोचू लागले आहेत. कोणतीही कपात नाही आणि कोणताही मध्यस्थ नाही. "एखोन बांग्लाए काटमानी चोले ना!" म्हणजेच, आता बंगालमध्ये कमिशनखोरी चालणार नाही!

50 लाख नव्या गरीब कुटुंबांना पक्की घरे मिळणार

गेल्या 12 वर्षांत केंद्र सरकारच्या अनेक योजनांचे लाभ बंगालमध्ये वेळेवर पोहोचू शकले नाहीत. यामुळे गरीब कुटुंबांचे सर्वाधिक नुकसान झाले. आता सरकारने या रखडलेल्या योजनांना वेगाने पुढे नेत आहे. बंगालमध्ये नवे सरकार स्थापन झाल्यानंतर 50 लाखांहून अधिक अशा गरीब कुटुंबांची यादी करण्यात येत आहे, ज्यांना प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत पक्की घरे दिली जातील. ■

प्रधानमंत्री का पूरा कार्यक्रम देखने के लिए QR कोड स्कैन करें।

‘पर्यावरण आणि हवामान बदलाचे भविष्य’ या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद

विकासाबरोबर पर्यावरणाचे संरक्षण

भारताने आपल्या ठोस धोरणांद्वारे हे सिद्ध करून दाखवले आहे की विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत. गेल्या एका दशकात पर्यावरणाच्या प्रत्येक क्षेत्रात देशाने अभूतपूर्व प्रगती केली आहे. याचाच परिणाम म्हणून जी-20 देशांमध्ये भारत हा एकमेव असा देश ठरला, ज्याने पॅरिस COP-21 करारातील उद्दिष्टे निर्धारित वेळेच्या आधी साध्य केली. 19 सप्टेंबर रोजी ‘पर्यावरण आणि हवामान बदलाचे भविष्य’ या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आज भारताचे दरडोई कार्बन उत्सर्जन जागतिक सरासरीच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे...

आंतरराष्ट्रीय परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्बन फूटप्रिंटबाबत जागतिक स्तरावर पसरलेल्या चुकीच्या समजुतीचा उल्लेख केला. ते म्हणाले की, यासाठी विकसनशील देशांना दोषी धरणे अयोग्य आहे. पंतप्रधान मोदी यांनी असे सांगण्याचे कारण म्हणजे विकसित देश भारताच्या तुलनेत दरडोई सहा पटीने अधिक कार्बन उत्सर्जन करतात. भारत संपूर्ण जगाला सोबत घेऊन पर्यावरण संरक्षणाचे नवे मानदंड स्थापित करत आहे. देशाने जीवाश्मेतर इंधन आणि सौर ऊर्जा क्षमतेच्या क्षेत्रात जागतिक मानके प्रस्थापित केली आहेत.



मोबाईल ॲप्लिकेशन



स्वच्छ ऊर्जा

12 वर्षांत सौर ऊर्जा क्षमता 2 गिगावॅटवरून वाढून 160 गिगावॅटपेक्षा अधिक झाली आहे.

30 लाख शेतकऱ्यांना कुसुम योजनेअंतर्गत सौर पंप मिळाले.

50 लाख घरे सौर ऊर्जेशी जोडण्यात आली. प्रत्येक घराला 80,000 रुपयांपर्यंत आर्थिक मदत.

200 दशलक्ष टन घट 'वन नेशन–वन ग्रिड'च्या मदतीने कार्बन उत्सर्जनात झाली.

■ जीवाश्मेतर ऊर्जा क्षमता सरकारच्या प्रयत्नांमुळे चौपटीने वाढली आहे.



स्वच्छ आणि आधुनिक वाहतूक

■ देशातील पहिली हायड्रोजन रेल्वे गाडी ही स्वच्छ आणि हरित वाहतुकीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल.

■ गेल्या वर्षी इलेक्ट्रिक वाहनांची विक्री 25 लाखांपर्यंत पोहोचली. 2014 पूर्वी ही संख्या 3,000 पेक्षा कमी होती. इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीत 950 पटीने वाढ झाली.

20
पेक्षा अधिक शहरांमध्ये मेट्रो नेटवर्क उपलब्ध झाले आहे. 2014 मध्ये मेट्रोची सुविधा केवळ पाच शहरांपर्यंत मर्यादित होती.





"गेल्या 12 वर्षांत पर्यावरणाशी संबंधित प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक विभागात भारताने असामान्य प्रगती केली आहे. आमचा मोठा भर नवीकरणीय ऊर्जेवर राहिला आहे आणि तिने पर्यावरणाच्या संरक्षणात मोठी भूमिका बजावली आहे.

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

जलसंवर्धनातून नैसर्गिक शेतीकडे

■ पाणी वाचवा: 'कॅच द रेन' अर्थात पावसाचे पाणी अडवा अभियानांतर्गत 70,000 पेक्षा अधिक अमृत सरोवरे आणि पावसाचे पाणी साठवण्यासाठी 1.5 कोटी बांधकामे करण्यात आली.

■ 2 कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांना 'प्रधान मंत्री कृषी सिंचन योजना' आणि 'थेंबागणिक अधिक पीक' या उपक्रमांचा लाभ मिळाला.

■ 12.5 लाख हेक्टर क्षेत्रात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत नैसर्गिक शेतीच्या 2400 गटांची स्थापना.

■ 3,000 पिकांचा हवामानाशी सुसंगत विकास.

■ गेल्या 12 वर्षांत घनदाट वन क्षेत्रात 22% पेक्षा अधिक वाढ.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 72 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले

भारतीय चित्रपटांमधील भविष्यातील संधी

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 22 सप्टेंबर 2026 रोजी गुजरातच्या केवडिया येथील एकता नगर मध्ये आयोजित एका समारंभात 2024 सालासाठीचे 72वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान केले. ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना भारतीय चित्रपट सृष्टीतील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल प्रदान करण्यात आलेल्या दादासाहेब फाळके पुरस्कारासह इतर विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कार विजेत्यांचे त्यांच्या प्रतिभा, समर्पण आणि कठोर परिश्रमाबद्दल राष्ट्रपतींनी अभिनंदन केले तसेच भारतीय चित्रपट हे भारतातील लोकांची स्वप्न, परंपरा, संघर्ष आणि भविष्यातील संधी यांचे प्रतिबिंब आहेत असे त्या म्हणाल्या...



तारा तोच असतो जो प्रकाश देतो, अंधःकार नाही

लोकप्रिय चित्रपट कलावंतांमध्ये देशातील जनतेला विशेषतः तरुणांना प्रभावित करण्याचे प्रचंड सामर्थ्य असते असे पुरस्कार सोहळ्यादरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले. जेव्हा यशस्वी चित्रपट कलाकार शिस्तबद्ध जीवनशैलीच्या फायद्याबद्दल बोलतात तेव्हा लाखो मुले आणि तरुण त्यांचे अनुकरण करतात. लोकप्रिय कलाकारांना माझी विनंती आहे की त्यांनी आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या पदार्थांचे समर्थन करणे टाळावे. तारा तोच असतो जो प्रकाश देतो, अंधःकार नाही

दिल्लीच्या बाहेर एकता नगर येथे चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडला

72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात

34 भाषांमधील 400 फीचर चित्रपट आणि

24 भाषांमधील 161 नॉन फीचर चित्रपटांचे प्रवेश प्राप्त झाले.

- यापैकी 22 फीचर चित्रपट आणि 23 नॉन फीचर चित्रपट श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.
- सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि जागतिक कथाकथनाचे एक शक्तिशाली माध्यम म्हणून भारतीय चित्रपटसृष्टी सातत्याने प्रगती करीत आहे.
- दिल्लीबाहेर एकता नगर येथे राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचे आयोजन करणे हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय ऐक्याप्रती असलेल्या दूरदृष्टी आणि वचनबद्धतेतून प्रेरित एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.



- ब्रम्ह्युगमसाठी ममूटी आणि चंदू चॅम्पियन साठी कार्तिक आर्यन यांना मुख्य भूमिकेकरिता संयुक्तरित्या सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला.



- आर्टिकल 370 साठी यामी गौतम हिला मुख्य भूमिकेकरिता सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पुरस्कार प्राप्त झाला.
- आर्टिकल 370 ला सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार प्राप्त झाला.
- सहाय्यक भूमिकेच्या श्रेणीत भक्षक या चित्रपटासाठी संजय मिश्रा यांची सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून निवड झाली.
- सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार महाराजा चित्रपटासाठी सचना नामिदास आणि मिथ्या चित्रपटासाठी रूपाश्री वरकडी यांना विभागून देण्यात आला.
- कल्की 2898 एडी या चित्रपटाला समग्र मनोरंजन करणारा सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट म्हणून घोषित करण्यात आले.
- रणदीप हुडा दिग्दर्शित स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शक पुरस्कार मिळाला.

72 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार देशातील सर्वोत्तम पर्यटन स्थळांवर आयोजित केले जाणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने प्रेरित होऊन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार देशातील सर्वोत्तम पर्यटन स्थळांवर आयोजित केले जात आहेत असे केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. राष्ट्रीय कार्यक्रमांचा विस्तार पारंपरिक स्थळांपलीकडे नेऊन त्यांना देशभरातील विविध ठिकाणांशी जोडण्याच्या पंतप्रधानांच्या दूरदृष्टीबद्दल त्यांनी माहिती दिली. आगामी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसाठी राज्यांना त्यांच्या सर्वोत्तम पर्यटन स्थळांचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी केले. यामुळे राष्ट्रीय चित्रपट सभागृहापुरते मर्यादित न राहता त्यापलीकडे जाऊन सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचतील असे ते म्हणाले.

गुजरात कडून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे भव्य स्वागत

गुजरात मध्ये आयोजित या सोहळ्याने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या प्रवासात एका नव्या पर्वाची सुरुवात केली. दिल्लीबाहेर राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आयोजित करण्याची नवी परंपरा सुरू केल्याबद्दल गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे आभार मानले. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या वारसा आणि सामर्थ्याशी निगडित असलेल्या केवडिया मधील एकता नगर येथे पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करणे ही गुजरातसाठी अभिमानाची बाब आहे असे त्यांनी सांगितले. ■



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले बारापुला फेज-3 उन्नत कॉरीडॉरचे उद्घाटन

राजधानीच्या संपर्क व्यवस्थेला प्राप्त झाली नवी गती

भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या मार्गावर आहे. राजधानी दिल्ली त्या विकास यात्रेचे प्रतिबिंब आहे. याच दूरदृष्टीने केंद्र सरकार येथे पायाभूत सुविधांच्या विस्ताराचे कार्य सातत्याने करीत आहे. याच संदर्भात 29 सप्टेंबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बारापुला फेज-3 कॉरीडॉरचे उद्घाटन केले ज्यामुळे दिल्ली आणि आसपासच्या परिसरातल्या लोकांना विना व्यत्यय संपर्क व्यवस्थेचा लाभ मिळेल तसेच इंधन आणि वेळेचीही बचत होईल...

दिल्लीच्या विकास प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी 1,941 कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केल्याने देशाच्या राजधानीच्या विकास प्रवासात आणखी एका महत्त्वाच्या अध्यायाची भर पडली.

- प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेला बारापुला फेज-3 उन्नत मार्ग आता दिल्लीच्या जनतेच्या सेवेसाठी समर्पित करण्यात आला आहे.
- यामुळे मयूर विहार फेज-1 पासून एम्स पर्यंतचा प्रवास सिग्नल विरहित होणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल, वेळ वाचेल आणि लाखो लोकांचा दैनंदिन प्रवास सुकर होईल.
- मुकरबा चौक भूमीगत मार्गाबरोबरच मोदी मिल-सावित्री सिनेमा पूल आणि लोनी भूमीगत मार्गामुळेदेखील दिल्लीच्या संपर्क व्यवस्थेला अधिक बळ मिळेल.
- वेळेची बचत, प्रवास सुलभ करणे आणि जीवनात सोयी सुविधांची वाढ करणे या उद्देशाने वेगाने काम केले जात आहे.



PMO India ✓
@PMOIndia

मुक्त व्यापार करार आपल्या तरुणांसाठी संधीची नवी दारे उघडत आहे.

अशा व्यापारी करारामुळे आपल्या उद्योजकांसाठी नवीन भागीदारीचे मार्ग खुले होतात, नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात आणि आपल्या तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात: PM @narendramodi



Rajnath Singh ✓ @rajnathsingh

तंत्रज्ञानाला सामान्य नागरिकांच्या जीवनाचा भाग बनवून जीवन सुलभ करणे ही मोदीजींची दूरदृष्टी आहे.

जनधन, यूपीआय, भारत आणि 5-जी नेटवर्क यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून पंतप्रधान @narendramodi जी यांनी भारताला 'विकसित भारत' या आपल्या संकल्पनेच्या दिशेने वेगाने पुढे नेले आहे. त्यांच्या या प्रयत्नामुळे जनतेचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.



Amit Shah ✓
@AmitShah

येत्या काही दिवसात नशा मुक्त मित्र देशातील 10 लाख शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांपर्यंत पोहोचून युवकांमध्ये जागरूकता निर्माण करतील.



Nitin Gadkari ✓ @nitin_gadkari

माननीय पंतप्रधान @narendramodi जी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आयुष्मान भारत योजना भारताच्या आरोग्य सेवा प्रवासात एक परिवर्तनशाली ताकद म्हणून उदयास आली आहे, ज्यामुळे दर्जेदार आरोग्य सेवा अधिक सुलभ, परवडणारी आणि लोक-केंद्रीत झाली आहे.



Nirmala Sitharaman Office ✓
@nsitharamanoffc

वर्ष 2014 मध्ये, माननीय पंतप्रधान मोदी यांनी किमान शिल्लक रकमेची अट न ठेवता पीएम जनधन खात्यांच्या माध्यमातून सर्वांसाठी बँकिंग क्षेत्राचे दरवाजे खुले केले.

वर्ष 2015 मध्ये, पीएम मुद्रा योजनेने लघु उद्योजकांना तारणाशिवाय कर्ज मिळवणे सुकर केले.

वेळेवर कर्जाची परतफेड केल्यामुळे लाभार्थ्यांना अधिक रक्कम मिळवणे, त्यांचे पत भांडवल मजबूत करणे आणि बँकांसोबत अधिक विश्वासार्हता निर्माण करणे शक्य झाले आहे.

आज अनेक जण आपला व्यवसाय वाढवत आहेत आणि नियमित बँकिंग सुविधांचा लाभ घेत आहेत.



Kiren Rijiju ✓
@KirenRijiju

माननीय पंतप्रधान @narendramodi जी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने अनिवार्य #EPFO कक्षेतील वेतन मर्यादा प्रति महिना 15 हजार रुपयांवरून 25 हजार रुपयांपर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली.

या निर्णयामुळे अतिरिक्त 51 लाखांहून अधिक कर्मचारी अनिवार्य ईपीएफओ च्या कक्षेत येण्याची अपेक्षा आहे.

आयुष्मान भारत के तहत चिकित्सा खर्च में रिकार्ड बचत : मोदी

नई दिल्ली, प्रेट : प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने कहा है कि आयुष्मान भारत के तहत अब 60 करोड़ से अधिक लाभार्थियों को सालाना पांच लाख रुपये स्वास्थ्य कवरेज का लाभ मिल रहा है। इससे चिकित्सा खर्च में रिकार्ड बचत हुई है। फलस्वरूप गरीब तथा मध्यम वर्ग को लाभ मिला है।

बुधवार को योजना के आठ साल पूरे होने पर पीएम ने एक्स पर लिखा कि आयुष्मान भारत योजना इस सोच के साथ शुरू की गई थी कि प्रत्येक भारतीय को गुणवत्तापूर्ण व किफायती स्वास्थ्य सेवा उपलब्ध होनी चाहिए। आज 60 करोड़ से अधिक लाभार्थियों को इसका लाभ मिल रहा है, जिससे यह दुनिया की सबसे बड़ी स्वास्थ्य योजना बन गई है। आयुष्मान आरोग्य मंदिरों में अब तक 500 करोड़ से अधिक लोगों की पहुंच दर्ज की गई है, जिससे जमीनी स्तर पर प्राथमिक स्वास्थ्य सेवा मजबूत हुई है।

- योजना के आठ साल पूरे होने पर कहा, 60 करोड़ लाभार्थियों को मिल रहा फायदा
- प्रत्येक भारतीय को बेहतर स्वास्थ्य सेवा देने के लिए शुरू किया गया था कार्यक्रम



प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ● हाइत छोटो

स्वस्थ नागरिक विजन के साथ बढ़ रही योजना

भाजपा अध्यक्ष नितिन नवीन ने कहा कि आयुष्मान भारत योजना स्वस्थ नागरिक और मजबूत देश के दृष्टिकोण के साथ आगे बढ़ रही है। प्रधानमंत्री मोदी के नेतृत्व में शुरू की गई इस योजना ने देशभर में नागरिकों के लिए स्वास्थ्य सेवा को अधिक सुलभ बनाने की दिशा में एक नया अध्याय खोला है।

48.54 करोड़ आयुष्मान कार्ड बने : स्वास्थ्य मंत्री जेपी नड्डा ने एक्स पर एक पोस्ट में कहा कि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना के तहत अब तक 48.54 करोड़ आयुष्मान कार्ड बनाए जा चुके हैं। 13 करोड़ से अधिक लोगों ने इलाज का लाभ उठाया है तथा देशभर में 39 हजार से अधिक सूचीबद्ध सरकारी एवं निजी अस्पतालों के माध्यम से लोगों को दो लाख करोड़ रुपये से अधिक के उपचार का लाभ मिला है। आयुष्मान भारत योजना 23 सितंबर, 2018 को शुरू की गई थी। 31 अगस्त तक 13.25 करोड़ लोगों के उपचार के लिए 2.03 लाख करोड़ रुपये की राशि उपलब्ध कराई जा चुकी है।

चिंतन शिविर में 68 मंत्रियों के साथ प्रधानमंत्री ने की चर्चा

विकसित भारत के लक्ष्य पर तेजी से हो रहा काम

मंथन

नई दिल्ली, विशेष संवाददाता। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी की अध्यक्षता में 'सेवातीर्थ' में व्यक्तिगत विकास की राह से शुरू हुआ दो दिवसीय महामंथन देश को 'विकसित भारत' की राह पर तेजी से दौड़ाने के संकल्प के साथ थमा। फोकस इस बात पर रहा कि आम नागरिक का जीवन आसान कैसे बने और सरकारी योजनाएं बिना किसी देरी के हर चौखट तक कैसे पहुंचें।

प्रधानमंत्री कार्यालय के नए परिसर सेवातीर्थ में दो दिवसीय चिंतन शिविर की शुरुआत बुधवार को 'रथ का विकास' विषय के साथ हुई। सूत्रों ने बताया कि शिविर के दौरान व्यापक मंथन का केंद्र 'विकसित भारत' के लक्ष्य को गति देना और शासन व्यवस्था को और अधिक प्रभावी बनाना रहा। इसमें मंत्रियों और उनके मंत्रालयों से जुड़े शासन, राजनीतिक कार्यप्रणाली और व्यक्तिगत स्तर से जुड़े विभिन्न पहलुओं पर चर्चा की गई।

जानकारी के अनुसार, चिंतन शिविर में कुल 68 केंद्रीय मंत्रियों ने हिस्सा लिया। मंत्रियों को चार मुख्य समूहों में विभाजित किया गया था और प्रत्येक समूह में 17 मंत्री शामिल थे। चर्चा को अधिक प्रभावी बनाने के लिए समूहों को आगे उप-समूहों में भी विभाजित किया गया। चिंतन शिविर की खास बात यह रही कि यह केवल चुनिंदा मंत्रियों या कुछ प्रस्तुतियों तक ही सीमित नहीं रहा। प्रधानमंत्री मोदी के समक्ष आठ प्रस्तुतियां दी गईं। लेकिन इस बार सभी 68 मंत्रियों को व्यापक चर्चा और मंथन की प्रक्रिया में शामिल किया गया। प्रत्येक प्रस्तुति के लिए लगभग एक घंटे का समय था।



युवाओं से संवाद करते पीएम मोदी।

सेवा के मार्ग से कभी नहीं होंगे विचलित : प्रधानमंत्री

नई दिल्ली, एजेंसी। मोदी ने भाजपा के 'सेवा संकल्प यात्रा' में शामिल युवाओं के साथ संवाद किया। इस दौरान कहा कि सेवा ही भाजपा के संस्कारों का मूल भाव रही है और पार्टी सेवा के मार्ग से कभी विचलित नहीं होगी। हमारे आचरण से लोगों को पता चले कि राजनीति में हमें कितनी ही बड़ी सत्ता क्यों न मिल जाए, लेकिन हमारा मूल मार्ग सेवा का ही रहेगा। हम कभी भी सेवा के मार्ग से विचलित नहीं होंगे, भले ही हम कितने ही ऊंचे शिखर पर पहुंच जाएं।

राष्ट्र निर्माण के संकल्प को दोहराया

युवाओं से प्रधानमंत्री ने कहा कि राजनीति, चुनाव और शासन व्यवस्था अपनी जगह है, लेकिन हम राष्ट्र निर्माण और विकसित भारत के संकल्प को लेकर निकले हैं। वर्ष 2047 तक विकसित भारत के निर्माण का संकल्प पूरा करने में युवा पीढ़ी की भूमिका अहम रहने वाली है।

प्रधानमंत्री ने विश्वप्रसन्नतीर्थ स्वामी से की भेंट

विश्वेशतीर्थ स्वामी की जन्मशताब्दी समारोह का लोगो जारी



लोगो का अनावरण करते पीएम मोदी व विश्वप्रसन्नतीर्थ स्वामी।

पत्रिका ब्यूरो
patrika.com

नई दिल्ली, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने मंगलवार को कर्नाटक के उडुपी स्थित पेजावर अधोक्षज मठ के विश्वप्रसन्नतीर्थ स्वामी से भेंट की। इस दौरान उन्होंने पद्म विभूषण यतीकुल चक्रवर्ती विश्वेशतीर्थ स्वामी की जन्मशताब्दी समारोह के लोगो का अनावरण किया।

प्रधानमंत्री ने कहा कि विश्वेशतीर्थ स्वामी का भक्ति, विद्या और सेवा से परिपूर्ण जीवन आज भी असंख्य लोगों को प्रेरित करता है। उनकी जन्मशताब्दी के अवसर पर होने वाली विभिन्न पहल उनके आदर्शों को आगे बढ़ाने में सहायक होंगी। प्रधानमंत्री मोदी ने सोशल मीडिया पोस्ट में विश्वेशतीर्थ स्वामी के जीवन और योगदान को स्मरण किया। इस अवसर पर केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय के कुलपति प्रो. श्रीनिवास वरखेड़ी सहित कई गणमान्य व्यक्ति मौजूद रहे।

सेवा यात्रा को विकसित भारत-2047 के राष्ट्र निर्माण से जोड़ा

सेवा की भावना को जमीन तक पहुंचाने में युवाओं की अहम भूमिका : पीएम मोदी

पत्रिका ब्यूरो
patrika.com

नई दिल्ली, प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने कहा कि सेवा का अर्थ केवल एक स्थान से दूसरे स्थान तक यात्रा करना नहीं है। लोगों से जुड़ना, समाज को समझना और सेवा की भावना को काम में बदलना भी इसका हिस्सा है। उन्होंने कहा कि सेवा की भावना को जमीनी स्तर तक पहुंचाने में युवाओं की महत्वपूर्ण भूमिका है। उन्होंने कहा कि जीवन का मुख्य उद्देश्य सेवा हर व्यक्ति में स्वाभाविक रूप से होनी चाहिए। राजनीति में भी, सर्वोच्च पद पर पहुंचने के बाद सेवा ही मार्गदर्शक सिद्धांत रहना चाहिए।

मोदी ने गुरुवार को भाजपा के 'सेवा संकल्प अभियान' के तहत वडनगर से वाराणसी तक निकाली जा रही 'सेवा संकल्प यात्रा' में शामिल युवाओं से वीडियो कॉन्फ्रेंसिंग के जरिए संवाद किया। उन्होंने युवाओं से यात्रा के अनुभव, ग्रामीण क्षेत्रों में लोगों से हुई बातचीत और इस दौरान मिली सीख के बारे में जाना। प्रधानमंत्री ने सेवा यात्राओं से जुड़े अपने अनुभव भी साझा किए और वडनगर-वाराणसी मार्ग से अपने जुड़ाव का उल्लेख किया।

'सीधे संवाद से मिली नई ऊर्जा'

भाजयुमो के राष्ट्रीय अध्यक्ष हेमांग जोशी ने प्रधानमंत्री के साथ संवाद को यात्रा में शामिल युवाओं के लिए खास अनुभव बताया। उन्होंने कहा कि कई दिनों तक साथियों पर रहने, गांवों में जाने, लाभार्थियों से मिलने और अलग-अलग सेवा कार्यों में भाग लेने के बाद प्रधानमंत्री को सीधे सुनना पूरी यात्रा के लिए नई ऊर्जा देने वाला रहा। जोशी ने कहा कि मोदी के 25 वर्ष के सार्वजनिक जीवन से युवाओं को यह सीख मिलती है कि सेवा किसी एक अवसर तक सीमित गतिविधि नहीं, बल्कि समाज और देश के प्रति लगातार जारी रहने वाली प्रतिबद्धता है।

अभियान में युवाओं की भागीदारी जरूरी

प्रधानमंत्री ने युवाओं की इस पहल को 'विकसित भारत-2047' के राष्ट्र निर्माण के बड़े लक्ष्य से जोड़ते हुए कहा कि सेवा की भावना को समाज के अंतिम स्तर तक पहुंचाने के लिए युवाओं की भागीदारी जरूरी है। भाजपा ने प्रधानमंत्री के जनप्रतिनिधि के रूप में 25 वर्ष पूरे होने के मौके पर 17 सितंबर से एक महीने का 'सेवा संकल्प अभियान' शुरू किया है।

10-10 टीमों की यात्रा

अभियान के तहत वडनगर से वाराणसी और वाराणसी से वडनगर के बीच 10-10 टीमें यात्रा कर रही हैं। इनमें करीब एक हजार युवा शामिल हैं। यात्रा के दौरान युवाओं की गांवों में पहुंच, लोगों से संवाद और विभिन्न सेवा गतिविधियों में भागीदारी पर जोर दिया जा रहा है।



असम के मोरीगांव में विश्व गैंडा दिवस के अवसर पर मंगलवार पोबितोरा वन्यजीव अभयारण्य में प्रियंका करता एक सींग वाला गैंडा। ● रॉ

मोदी ने गैंडा संरक्षण के प्रयासों को सराहा

नई दिल्ली। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने मंगलवार को देश में गैंडा संरक्षण के प्रयासों की सराहना की। साथ ही कहा कि इस संकटग्रस्त प्रजाति के संरक्षण, उसके पर्यावास के प्रबंधन और उसकी संख्या की स्थिति को समझने के लिए संबंधित राज्यों को वित्तीय और तकनीकी सहायता के लिए 'प्रोजेक्ट राइनो' शुरू किया गया है। विश्व गैंडा दिवस पर मोदी ने कहा कि देश दुर्लभ एक सींग वाले गैंडे के संरक्षण पर गौरव व्यक्त करता है। साथ ही संरक्षण से जुड़े लोगों को सराहा।



आझाद हिंद सरकारचा 83 वा स्थापना दिन

21 ऑक्टोबर 2026

आझाद हिंद सेना

पहिली लष्करी मोहीम सुरू केली

नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे असे नायक आहेत ज्यांच्या केवळ स्मरणाने मनात देशभक्तीची लाट उसळते. त्यांनी युवकांना संघटित केले आणि आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून पहिली लष्करी मोहीम सुरू केली. अंदमान आणि निकोबार बेटांवर तिरंगा फडकावला आणि 1943 मध्येच त्यांनी स्वतंत्र भारताची घोषणा दिली . आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून नेताजींनी स्वतःच्या सैन्याच्या आणि लष्करी मोहिमांच्या जोरावर राष्ट्र स्वातंत्र्य प्राप्त करू शकते हा दृढ विश्वास क्रांतिकारकांच्या मनात जागवला...



- नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी 21 ऑक्टोबर 1943 रोजी आझाद हिंद सरकारची स्थापना केली होती. या सरकारने बँका, चलन आणि टपाल तिकीटे देखील सुरू केली होती.
- नेताजींनी राणी झाशी रेजिमेंटची स्थापना करून सशस्त्र सैन्यात महिलांना समान संधी प्राप्त करून दिल्या होत्या.



“नेताजींचे एकच उद्दिष्ट, एकच ध्येय होते - भारताचे स्वातंत्र्य. भारतमातेला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करणे. हीच त्यांची विचारधारा होती आणि हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. ***- नरेंद्र मोदी, पंतप्रधान***

न्यू इंडिया समाचार
पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 16-31 ऑक्टोबर , 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक - 1 ऑक्टोबर 2026, एकूण पृष्ठे-46)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद
महासंचालक, केंद्रीय संचार ब्युरो

कक्ष क्रमांक - 278, केंद्रीय संचार ब्युरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली- 110003 येथून प्रकाशित